जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

# विकृती

आपल्या एकंदरच जगण्यात एक प्रकारची विकृत आध्यात्मिकता बोकाळते आहे की काय, अशी शंका आताशा येऊ लागली आहे. असे म्हणण्याने आपल्यापैकी अनेकांना कदाचित रागही येईल. 'विकृती' आणि 'आध्यात्मिकता' या दोन बाबी एकमेकींच्या हातात हात घालून एकत्र नांदणे शक्य तरी आहे का, असा सवालही कित्येक जण पैदा करतील. असा काहीसा दावा करणे हीसुद्धा अनेकांना एक विकृतीच वाटेल ! पण जरा विचार करून बघा. अध्यात्मिक वृत्तीने जगणे म्हणजे शुद्ध वर्तमानात जगणे. जे घडून गेले त्याबाबत उगाचच खंत वा शोक करायचा नाही. जो भविष्यकाळ अजूनही अज्ञाताच्या उदरातच आहे त्याबाबत चिंता, अपेक्षा... असे काही काही मनात बाळगायचे नाही. तर, वर्तमानात जो क्षण आपल्या हातात आहे तो खरा, असे मानून जगणे म्हणजे 'अध्यात्म' अशी अध्यात्माची एक व्याख्या केली जाते. या अर्थाने आम्ही सारेच आज 'आध्यात्मिक' बनत आहोत. कारण, 'उद्या'चा विचार करण्याचे आम्ही जणू विसरूनच गेलो आहोत ! आज स्वस्तात कर्ज मिळते आहे तर घेऊन टाका, गाडीचे नवीन 'मॉडेल' आले आहे ना, आपल्या दारात पाहिजेच ते, 'बाय वन् गेट टू फ्री'ची 'स्कीम' आली आहे ना, चला तर मग खरेदीला... हा आपला आजचा खाक्या बनला आहे. या अर्थाने 'वर्तमानात' जगत असल्याने आम्ही 'आध्यात्मिक' बनतो आहोत ! जे काही करावयाचे ते आत्ताच. जे काही हवे ते लगोलग. मात्र, आमच्या या आध्यात्मिकतेला 'विकृत' हे विशेषण जोडण्याखेरीज पर्याय नाही, कारण, ज्या स्वार्थपरायणतेचा विशुध्द अध्यात्माला विटाळ गणला जातो नेमक्या त्याच स्वार्थपरायणतेने आमची ही प्रचलित 'आध्यात्मिक' वृत्ती ठासून भरलेली आहे. आम्ही वर्तमानात जगतो पण केवळ स्वतःपुरतेच. त्यात दुस-याचा विचारच नाही. माझ्या सुखासाठी, मग, समोरच्याचे जगणे हराम झाले तरी बेहेत्तर, असा हा खाक्या आहे. संपूर्ण जगाला भेडसावणा-या आजच्या मंदीपासून ते उभ्या मानवजातीचेच भविष्य काळवंडून टाकणा-या पर्यावरण-हासाच्या प्रश्नापर्यंत विविध समस्यांचे बीज या आमच्या विकृत आध्यात्मिकतेतच रुजलेले आहे. कमालीच्या -हस्व दृष्टीच्या आणि तितक्याच आत्मकेंद्रित जीवनप्रणालीचा हा अपरिहार्य परिपाक ठरतो. विश्वास बसणार नाही इतक्या -हस्व दृष्टीने जगण्याच्या सध्या सर्वत्र बोकाळेल्या प्रवृत्तीमधून ही आत्मकेंद्रितता निपजते की, टोकाच्या आत्मकेंद्रिततेमुळे -हस्व दृष्टीचा परिपोष होतो, हेही सांगता येणे आताशा अवघड बनू लागले आहे. सुलभ व्याज दराने मिळणारी कर्जे भराभर पदरात पाडून घेऊन दोन-दोन घरे उठविणा-या 'सब् प्राइम' अमेरिकी कर्जदारांनी या आपल्या धुंदीचा एकंदर अर्थव्यवस्थेवर काय व किती व्यापक परिणाम घडून येईल, याची क्षिती बाळगली नाही. तर,

*(पृष्ठ २६ वर पाहावे)*



## वाचकांचा प्रतिसाद

आपल्या मासिकाचे स्वरूप विचारप्रवर्तक आहे. निवृत्तीनंतरच्या काळात माझ्या स्वाभाविक आवडीप्रमाणे वाचन-चिंतन-मनन करण्यासाठी योग्य त्या साहित्याच्या शोधात मी होतो. 'अर्थबोधपत्रिके'चे आधीचे अंक मी पाहिलेले-वाचलेले होते. त्यामुळे मी लगेचच वर्गणीदार झालो. 'अर्थबोधपत्रिके'त आपण विविध विषयांची जी माहिती देता ती चिंतनास उपयुक्त असते. पूर्वी नोकरीच्या धकाधकीत ज्या विषयांचा परामर्श मी घेऊ शकत नव्हतो तो आता 'अर्थबोधपत्रिके'मुळे घेता येतो. कुठलेही व्यावसायिक स्वरूप नसलेला, एकही व्यावसायिक जाहिरात नसलेला आगळावेगळा अंक, हे आपल्या मासिकाचे जाणवणारे ठळक वैशिष्ट्य.

**विलास केशव अजोतीकर, पुणे.**

### निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भासाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

# सामना

आपल्या भवताली आपण अशी अनेक माणसे बघतो की त्यांच्या पुढ्यात उभे ठाकलेले संकट जेवढे मोठे तेवढी त्या संकटाशी दोन हात करण्याची त्यांची हिंमतही बुलंद असते. किंबहुना, एखादी समस्या उद्‌भवली की तिच्यावर मात करण्याची हिकमत शोधण्याच्या दिशेने त्या क्षणापासून त्यांची मती कार्यशील बनते. सध्या उभ्या जगालाच भेडसावणा-या मंदीबाबतही, काही प्रमाणात का होईना पण, हेच घडताना दिसते आहे. १९३०च्या दशकात जगाने अनुभवलेल्या महामंदीची आठवण करू न देणारेच सारे वातावरण आज आसमंतात आहे. अमेरिकी मातीत बीजारोपण झालेल्या या मंदीच्या रोपट्याचा विस्तार कोठवर आणि किती काळ चालू राहणार आहे, या बाबत काहीही ठामपणे सांगण्याच्या परिस्थितीत आज कोणीही नाही. २००८ सालच्या सप्टेंबर महिन्यात अवतरलेल्या या आर्थिक संकटाचे अक्राळविक्राळ रू प आपल्याला अजूनही दिसलेलेच नाही, इथपासून ते, साधारणपणे २०११ सालच्या आगेमागे मंदीचे ढग बरेचसे निवळतील इथपर्यंत नाना प्रकारचे अदमास वर्तविले जात आहेत. काही जणांच्या मते तर मंदीचा हा माहौल जगाला चांगला २०२० सालापर्यंत वेढून राहील. मतामतांच्या या गलबल्याने तुमच्या-माझ्यासारखा सर्वसामान्य पार गोंधळून जाईल नाही तर काय ! या सगळ्या घडामोडींमुळे जागतिक अर्थकारणाची घडीच बदलून जाईल का, असाही एक प्रश्न मनामध्ये उमटतो. जगाच्या विविध भागांतील सर्वच देशांमध्ये गेल्या दोन दशकांदरम्यान, कमी-अधिक प्रमाणात का होईना, आर्थिक सुधारणांना हात घातला गेला आहे. या सुधारणांवर मंदीमुळे काय परिणाम घडून येईल, हाही असाच आणखी एक प्रश्न. आजची ही मंदी खाजगीकरण-उदारीकरणाच्या मंत्राचा जप केल्यामुळेच उद्‌भवलेली आहे, असाही सूर कोणी कोणी लावतात. हे खरोखरच खरे असेल का... हाही एक प्रश्नच. आपल्याला, खरे म्हणजे, उत्सुकता असते ती या सगळ्या अरिष्टावर कोणते उपाय सुचविले जात आहेत, ते जाणून घेण्याची. या उपायांच्या संभाव्य दिशांबाबतचे काही मंथन इथून पुढच्या पानांमध्ये मांडले आहे. ■■





# आव्हान 'बाहेरचे' आणि 'घरचे'

एखादे संकट वा अरिष्ट वा समस्या उद्‌भवली की तिच्या मागील कारणांची चर्चा ताबडतोब सुरू होते. समजा, कारणांची मोठी मालिकाच असेल तर मग, 'तात्कालिक कारण' कोणते यांबाबत हिरिरीने मंथन चालू होते. गेल्या वर्षीच्या सप्टेंबर महिन्यापासून घोंघावू लागलेल्या मंदीच्या वावटळीबाबतच्या चर्वित्‌चर्वणाचा प्रवासही याच वळणावळणांनी आजवर आलेला दिसतो. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील 'सब् प्राइम' कर्जांचा फुगा फुटल्याने अमेरिकी अर्थव्यवस्थेची घसरण सुरू झाली आणि जागतिकीकरणाच्या माध्यमातून देशोदेशीच्या अर्थव्यवस्थांची एकमेकींशी सांगड बसलेली असल्याने अमेरिकी अर्थव्यवस्थेच्या पाठोपाठच देशोदेशीच्या अर्थव्यवस्थांमध्येही घसरगुंडीचे पर्व अवतरले, असे एक विश्लेषण केले जाताना दिसते. पाण्यात बुडणा-या माणसाला वाचविण्यासाठी गेलेल्याच्या गळ्याला बुडणा-याने घट्ट मिठी मारली तर तारणाराही बुडतो तशातलीच ही गत ! शीतयुद्धाच्या अंतानंतर उभ्या जगाचा व्यवहार कमालीचा अमेरिकाकेंद्री बनल्याने हे असे घडणे स्वाभाविकही होते.

परंतु, गंमत अशी आहे की, जागतिक स्तरावरील व्यापारप्रवाहांचे चलनवलन बारकाईने निरखणा-या अभ्यासकांच्या मते या आर्थिक अरिष्टाच्या केंद्रस्थानी अमेरिका आणि चीन हे दोन देश आहेत. या दोन महासत्तांदरम्यान ज्या प्रकारचे व्यापारी संबंध गेले सुमारे दशक-दीड दशक विकसित झाले होते त्यांत या अरिष्टाची बीजे रुजलेली आहेत, असे या अभ्यासकांचे विश्लेषण आहे. त्यामुळे, या संकटातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधण्याची धडपडही मुख्यतः याच दोन देशांना पुढाकार घेऊन करावी लागेल, असा एक मतप्रवाह सध्या दिसतो. याचा अर्थ बाकीच्या देशांनी हातावर हात ठेवून गप्प बसावे, असा अजिबात नाही. किंबहुना, प्रत्येकच देशाला सध्याच्या मंदीची झळ कमी-अधिक प्रमाणात पोहोचली असल्याने यातून बाहेर कसे पडायचे याचा विचार आज सगळेच जण करीत आहेत. समस्येचा निचरा होण्यासाठी तिच्या मुळाचे आकलन अचूक होणे गरजेचे ठरते. आर्थिक मंदीचे हे संकट अमेरिकी भूमीतून अंकुरलेले असले तरी देशोदेशीची भूमीही त्याच्या वाढविस्तारास पूरक ठरणारी अशीच होती व आहे, ही बाब इथून पुढच्या विवेचनादरम्यान पक्की ध्यानात ठेवावयास हवी.

मंदीच्या आजच्या संकटाला संदर्भ आहे तो चीन व अमेरिका यांच्या दरम्यानच्या गेल्या १० वर्षांतील व्यापारी देवाणघेवाणीचा. या व्यापारी देवाणघेवाणीचे वैशिष्ट्य असे की, चीनच्या व्यापारी खात्यावर या संपूर्ण कालावधीदरम्यान सतत आधिक्य होते. तर, अमेरिकेच्या खात्यावर तूट. याचाच अर्थ हा की, अमेरिकेकडून केल्या जाणा-या आयातीपेक्षा चीन अमेरिकेला अधिक निर्यात करत होता. उभ्या जगाचा 'मॅन्युफॅक्चरिंग बेस' म्हणून चीनची जी प्रतिमा गेल्या काही वर्षांत तयार झालेली आहे, तिच्याशी सुसंगत असाच हा सारा व्यवहार होता. निर्यातीद्वारे चिनी अर्थव्यवस्थेत प्रवेशणारे परकीय चलन - म्हणजेच अमेरिकी डॉलर - आणि या परकीय चलनाची बाळसेदार गंगाजळी हे चिनी अर्थव्यवस्थेच्या मजबुतीचे एक लक्षण मानले जाते. या प्रकारची व्यापारी देवाणघेवाण ही या दोन्ही देशांच्या एक प्रकारे पथ्यावरच पडणारी होती. व्यापारातील आधिक्य (surplus) चीनला हवेच होते कारण निर्यातीद्वारे जमा होणारे डॉलर चीन पुन्हा अमेरिकी सरकारच्या कर्जरोख्यांतच गुंतवत होता. तर, चिनी


**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे आद्य प्रकाशन**
**आता पुनर्मुद्रित स्वरूपात**

**भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज**

**Poverty in India**

**लेखक**

**वि.म. दांडेकर** **नीळकंठ रथ**

**पृष्ठे १४०** **किंमत : २००/- रुपये**

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा विविध स्तरांतील वाचकांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**




गुंतवणुकीच्या मार्गाने येणारी ही रोखता अमेरिकी अर्थव्यवस्थेमध्ये सुलभ कर्जांच्या रूपाने फिरवता येत होती. या द्वारे दोन्ही अर्थव्यवस्थांच्या प्रगतीची चाके भिरभिरती ठेवणे सुलभ होते.

**फरक दोन मनोवृत्तींमध्येच**

चीन आणि अमेरिका या उभय देशांमधील सर्वसामान्य नागरिक, सरकार, धोरणकर्ते, बँकांसारख्या वित्तीय संस्था यांच्या मूल्यव्यवस्थेशीही हा सारा खाक्या सुसंगतच होता. मुळात, अमेरिकी संस्कृती उपभोगप्रवण आहे. बचतीपेक्षाही सर्वसामान्य अमेरिकी नागरिकाचा भर हा खर्च करण्याकडेच अंमळ झुकलेला असतो. चिनी माणूस याच्या बरोबर विरुद्ध मनोवृत्तीचा. त्याचा कल बचतीची प्रतिष्ठा मानणारा. त्यातच, जगाचा 'मॅन्युफॅक्चरिंग बेस' बनण्याचे चिनी धोरणकर्त्यांचे स्वप्न. त्यामुळे, चिनी बचतीचे रूपांतर गुंतवणुकीमध्ये करून ती गुंतवणूक पुन्हा भांडवलाच्या रूपाने उद्योगांच्या निर्मिती-विस्तारासाठी लावण्याकडे चिनी धोरणकर्त्यांचा भर. दुस-या शब्दांत सांगावयाचे तर, उपभोगापेक्षा चिनी माणसाचा जोर उत्पादनावर अधिक. अमेरिकी माणसाचा पिंड बरोबर उलटा. बचतीपेक्षा त्याचा भर खर्चावर जास्त. म्हणजेच, उत्पादनापेक्षा प्राधान्य उपभोगाला. उत्पादनापेक्षा उपभोगाकडे, बचतीपेक्षा ग्राहकोपयोगी जिनसांच्या खर्चाकडे असलेला अमेरिकी कल, आणि, उपभोगापेक्षा उत्पादनावर, खर्चापेक्षाही बचत आणि गुंतवणुकीवर असलेला चिनी भर यांत एक संतुलन प्रस्थापित झाले होते. गंमत म्हणजे, या परस्परविरोधी प्रवृत्ती परस्परांच्या आर्थिक प्रगतीस पोषकच ठरत होत्या. निर्यातीद्वारे मिळणारे व्यापारी आधिक्य (surplus) चीन पुन्हा अमेरिकी सरकारच्या कर्जरोख्यांतच गुंतवत असल्याने ही रोखता अमेरिकी शेअर बाजार तसेच बांधकाम उद्योगातील तेजीची गंगोत्री ठरली. अमेरिकी बँकांनीही सुलभ कर्जांचा धडाका लावला. त्यातून ग्राहकोपयोगी वस्तू व सेवांना असलेल्या मागणीची कमान चढू लागली. ही मागणी चिनी निर्यातीच्या वाढीस इंधन पुरवू लागली. त्यातून चिनी गुंतवणूक, उत्पादन, रोजगार व मागणी हे चक्र धावू लागले. 'सब् प्राइम' कर्जांचा फुगा फुटेपर्यंत प्रगतीची अमेरिकी आणि चिनी चाके एकमेकांना वंगण पुरवत बिनबोभाट फिरत होती.

जगातील बाकीचे देशही या सा-या चक्रनेमिक्रमाचे साक्षीदार होतेच. खास करून १९९७मध्ये उद्‌भवलेल्या पूर्व आशियाई संकटापासून तर अनेक देशांनी एक धडा घेतला होता. आपापल्या आर्थिक प्रगतीसाठी अत्यावश्यक असलेल्या परकीय

चलनाच्या पुरवठ्यासाठी 'हॉट मनी'च्या स्वरूपात अर्थव्यवस्थेत प्रवेशणा-या परकीय गुंतवणुकीवर, परदेशांकडून घेतलेल्या कर्जांवर विसंबून राहावयाचे नाही, हा तो धडा. परकीय चलनाची गंगाजळी गुटगुटीत बनविण्याचा सुरक्षित मार्ग म्हणजे निर्यात वाढवायची, ही खूणगाठ परकीय चलनाच्या संकटात पोळून निघालेल्या पूर्व आशियाई देशांनी आपल्या मनाशी पक्की बांधली. या देशांनीही मग आपापल्या निर्यातीस चालना देण्यासाठी अनुरूप धोरणांची अंमलबजावणी करण्यावर लक्ष केंद्रित केले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी होत असलेल्या जवळपास सर्वच देशांनी उदारीकरणाच्या दिशेने जाणारी पावले कमी-जास्त प्रमाणात उचलल्याने एकंदरच जागतिक बाजारपेठ विस्तारू लागली होती. उदारीकरणाद्वारे देशोदेशीच्या बाजारपेठांची साखळी तयार झाल्याने निर्यातीवर भर देणा-या देशांना विस्तारणा-या जागतिक बाजारपेठेचा टेकूही मिळाला.

**नवीन 'बॅलन्स'च्या शोधात**

चीनसह एकंदरच नवविकसनशील देशांनी गेल्या सुमारे दशक-दीड-दोन दशकांदरम्यान विकासाचे हे निर्यातोन्मुख 'मॉडेल' हिरिरीने अंगिकारल्यामुळेच मंदीचे आजचे संकट सघन आणि सर्वव्यापक बनते आहे वा बनले आहे, असे विश्लेषण आता करण्यात येत आहे. अमेरिका आणि युरोपीय समुदायातील बाजारपेठा आपल्या उत्पादनांसाठी कशा व कितपत विस्तारतील यांवरच या देशांचा व त्यांच्या निर्यातविषयक धोरणांचा सारा भर अलीकडील काळात एकवटलेला होता. 'सब् प्राइम' कर्जांच्या अरिष्टापायी अमेरिकी अर्थव्यवस्थेला दणका बसला आणि हे सगळे समीकरणच पार बदलून गेले. या संकटामुळे हबकलेला अमेरिकी ग्राहक आज खरेदी करण्यासच बिचकतो आहे. त्यांचा अवघा नूरच पालटलेला दिसतो. आजवर खर्चाकडे धावणा-या वृत्तीला त्याने जणू काही मुरडच घातलेली आहे. सर्वसामान्य अमेरिकी नागरिक आज बचत करण्याच्या मनःस्थितीत प्रवेशलेला आहे. मंदीच्या हातात हात घालून अमेरिकी अर्थव्यवस्थेत आता बेरोजगारीनेही पाऊल घातल्याने तर नोक-यांबाबतचे भविष्यही अस्थिर बनते आहे. नोकरीचीच शाश्वती नसेल तर खरेदीसाठी कोण सरसावेल ? त्यामुळे अमेरिकी मागणी थंडावलेली आहे. प्रसंगी कर्जाऊ निधी घेऊन ग्राहकोपयोगी वस्तूंच्या खरेदीवर खर्चणा-या अमेरिकी ग्राहकाच्या खरेदीची भूक सुलभ कर्जाचे इंधन पुरवून प्रज्ज्वलित ठेवणा-या बँकांची तोंडेही पोळलेली असल्याने त्यांनीही कर्जवाटपाबाबत हात आखडता घेतलेला आहे. यामुळे, उत्पादनापेक्षा उपभोगाचे प्रमाण अधिक असल्याने



अमेरिकी अर्थव्यवस्थेत तयार झालेले असंतुलन, आणि, उपभोगापेक्षा उत्पादनाची मात्रा अधिक असल्याने चिनी अर्थव्यवस्थेसह अन्य निर्यातोन्मुख अर्थव्यवस्थांमध्ये तयार झालेले असंतुलन यांतील 'बॅलन्स' आता ढळलेला आहे.

कोणतेही असंतुलन अनंत काळ टिकत नसते. एक संतुलन ढळले रे ढळले की प्रवास लगेचच सुरू होतो तो दुस-या संतुलनाच्या दिशेने. नवीन संतुलन शोधणे म्हणजेच मंदीमधून बाहेर पडण्याच्या तयारीस लागणे. त्यासाठी, अभ्यासकांच्या मते, दोहोंपैकी एक गोष्ट घडून येणे अत्यावश्यक आहे. एक तर अमेरिकी अर्थव्यवस्थेतील उपभोगप्रवणता पूर्ववत व्हावी लागेल. तसेच/किंवा चीनसह अन्य निर्यातप्रधान अर्थव्यवस्थांमधील उपभोगाची म्हणजेच पर्यायाने मागणीची मात्रा वाढावी लागेल. मंदी आणि वाढती बेरोजगारी यांचा धसका घेतलेला अमेरिकी नागरिक खरेदीसाठी बाहेर पडणार नसेल तर मग अमेरिकी सरकारलाच कंबर कसावी लागेल. सरकारनेच धडाक्याने मोठ्या गुंतवणुकीच्या योजना राबविल्या की अर्थव्यवस्थेतील मागणी सशक्त बनेल. या पैकी काहीच घडून आले नाही तर मात्र मग आपल्या उत्पादनाला (आणि साहजिकच निर्यातीला) पायबंद घालण्याखेरीज मुख्य म्हणजे चीन आणि अन्य निर्यातप्रधान अर्थव्यवस्थांना अन्य पर्यायच उरणार नाही.

मात्र, अभ्यासकांचा दुसरा गट या भूमिकेतील एका महत्त्वाच्या धोक्याकडे सगळ्यांचेच लक्ष वेधतो आहे. या पद्धतीने नवीन संतुलनाकडे सरकण्याचा प्रयत्न जग करू लागले तर, मंदीच्या आज ओढवलेल्या संकटावरून आपण काहीच बोध घेतलेला नाही या निष्कर्षाप्रत येण्यावाचून गत्यंतर नाही, असे या अभ्यासकांचे म्हणणे आहे. आपल्या उत्पादनांच्या विक्रीसाठी प्राधान्याने परदेशी मागणीवरच (म्हणजेच मुख्यतः अमेरिकी बाजारपेठेवर) निर्भर राहण्याच्या निर्यातप्रधान देशांच्या परिपाठापायीच आजचे अरिष्ट सघन आणि सखोल बनले आहे. त्या ऐवजी चीनसह सगळ्याच निर्यातोन्मुख देशांनी इथून पुढे आपापल्या देशांतर्गत बाजारपेठेतील मागणी सशक्त बनविणारी धोरणे नेटाने राबवावीत, अशी भूमिका आता जोर धरू लागली आहे. अमेरिकी मागणीवर बेतलेली अतिरिक्त उत्पादनक्षमता पुरेपूर वापरली जाण्याच्या दृष्टीने या देशांनी, खास करून या देशांच्या सरकारांनी, मोठ्या खर्चांच्या योजनांची अंमलबजावणी आपापल्या अर्थव्यवस्थांत वेगाने हाती घेतली तर मंदीवर मात करण्याच्या दिशा उजळतील, असे हे तर्कशास्त्र आहे. याचा अर्थ इतकाच की, मंदीचे हे आव्हान जितके 'बाहेरचे' आहे तितकेच ते 'घरचे'देखील आहे. ■■

मंदी - २

# वारा बदलतो आहे...?

संकटाच्या वेळी डोके शांत ठेवावे, असे नेहमीच सगळे सांगतात. परंतु, असे उपदेश वा कसोटीच्या प्रसंगी कसे वागावे यांबाबत पुस्तकात दिलेल्या सूचना वास्तवात खरोखरच उतरतात का ? संकटसमयी आपली विचारशक्ती तेवढी शाबूत राहते का ? समजा, ज्या बसमधून आपण प्रवास करीत आहोत त्या बसच्या इंजिनामधून एकदम धूर बाहेर पडू लागला तर आपली प्रतिक्षिप्त क्रिया काय होईल ? साहजिकच आपण बसच्या दरवाजाकडे धाव घेऊ. आपणच का, बसमधील प्रत्येकच जण तसे करील. त्याचा परिणाम एवढाच होईल की बसच्या दरवाजाशी झुंबड उडून कोणालाच सुरक्षित बाहेर पडता येणार नाही. हा आपला नित्याचा अनुभव असूनही आपल्यावर प्रसंग गुदरतो तेव्हा एकेकाने एका वेळी जागा सोडून दरवाजाबाहेर पडण्याचा सुज्ञपणा आपण दाखवतो का ?

मात्र, तुम्हा-आम्हांला भेडसावणा-या मंदीवर उपाय शोधण्याच्या बाबतीत असा प्रगल्भ धोरणीपणा प्रकट करण्याची निकड आता निर्माण झालेली आहे. तसे जर आपण केले नाही तर ही मंदी खरोखरच अधिक भेसूर रूप धारण करील, असे इशारे जगभरातील अभ्यासक-संशोधक देत आहेत. अमेरिका व युरोपीय समुदायासह एकंदरच विकसित जगातील मागणी मान टाकून पडलेली असल्याने निर्यातप्रधान विकासाचे ‘मॉडेल’ आजवर मनोभावे राबविलेल्या चीनसह एकंदरच सर्व विकसनशील देशांनी आता आपापल्या अर्थव्यवस्थांमधील मागणीचे, बाजारपेठांचे संगोपन करण्यावर भर द्यावा, असे जे प्रतिपादन काही अभ्यासक अलीकडे करीत आहेत त्या मागील ‘लॉजिक’ नेमके हेच आहे.

परंतु, आजचे चित्र काय आहे ? चीन, भारत यांसारख्या देशांमधील धोरणकर्त्यांनी मंदीच्या चपेट्यात आलेल्या निर्यातप्रधान उद्योगांची बाजारपेठीय स्पर्धात्मकता टिकून राहावी यासाठी जी ‘पॅकेजेस्’ जाहीर केली त्यांत आयात-निर्यातीशी संलग्न करसवलती, अनुदाने अशा उपायांचा अंतर्भाव आहे. अर्थशास्त्रीय तर्काच्या निकषांवर ही उपाययोजना अचूक ठरते. परंतु, विकसित देशांमधील बाजारपेठांवर अवलंबून राहून आपापल्या अर्थव्यवस्थांमध्ये उत्पादनक्षमता निर्माण केलेल्या सगळ्याच देशांनी हीच



पावले एकाच वेळी उचलली तर ? अशा चढाओढीचे संभाव्य परिणाम दोन. एक तर यातून नाना प्रकारच्या सवलतींची खैरात आपापल्या देशांमधील निर्यातप्रधान उद्योगांवर करण्याची एक अनिष्ट स्पर्धा निपजेल. दुसरे म्हणजे, विकसित जगातील आयातदार देश आज ना उद्या प्रतिबंधात्मक उपायांच्या भिंतीचे बांधकाम हाती घेतीलच घेतील. नव्हे नव्हे ते त्यांना हाती घ्यावेच लागेल ! जनमताच्या रेट्याची दखल देशोदेशीच्या राज्यकर्त्यांना घेणे भागच पडेल.

या वास्तवाची चुणूक आजच दिसू लागलेली आहे. उदारीकरण, खुलेपणा यांच्या माध्यमातून जागतिकीकरणाची प्रक्रिया सर्वसंचारी बनल्यामुळेच मंदीचा विळखाही संपूर्ण जगाला सहजगत्या वेटाळू शकला, अशी धारणा ठिकठिकाणी जोर धरत आहे. यातून, जागतिकीकरणविरोधी स्वर कणखर होत असल्याचे वास्तव अनुभवास येते आहे. ‘आर्थिक राष्ट्रवादा’ची भावना तीव्रपणे मुखर होत असल्याचे जे चित्र अमेरिकेपासून ते ग्रीसपर्यंत आज दिसते तो याच मानसिकतेचा परिपाक होय. परंतु, मंदीच्या सध्याच्या परिस्थितीत, या भावनेला खतपाणी घालणे म्हणजे जणू आगीतून उठून फुफाट्यात पडण्यासारखेच ठरेल, असा इशाराही सातत्याने दिला जातो आहे.

मंदीची झळ पोहोचलेल्या उद्योगांना सरकारने मदतीचा हात द्यावा, अशी जी मागणी जोरदारपणे केली जाते आहे, त्या मागणीच्याच बरोबरीने आर्थिक खुलेपणाकडून पुन्हा एकवार बंदिस्त आर्थिक वास्तवाकडे जनमत झुकू लागले आहे, याचा प्रत्यय अलीकडील काळात अनेक ठिकाणी आलेला दिसतो. अमेरिकी बँका तसेच उद्योगांसाठी अमेरिकी सरकारने वित्तीय साहाय्याचे ८०० अब्ज डॉलरचे जे ‘पॅकेज’ जाहीर केले त्या ‘पॅकेज’च्याच जोडीने, ‘अमेरिकी उद्योगघटकांनी आपापल्या उद्योगांचे अमेरिकीपण जोपासण्याबाबतची दक्षता बाळगावी’, असे कलमही जारी करण्यात यावे असा पवित्रा अमेरिकी काँग्रेसने घेतला. पुनर्बांधणीसाठी सरकारी मदतीचा हात स्वीकारणा-या अमेरिकी उद्योगांनी आपापल्या उद्योगांत केवळ अमेरिकेत तयार झालेले सुटे भाग वा उपकरणेच वापरावीत अशा प्रकारचे ‘डायरेक्टिव्ह्’ दिले जावे, अशी अमेरिकी काँग्रेसची सूचना होती.

देशाच्या अर्थकारणात सरकार आणि खासगी उद्योग क्षेत्र जी भूमिका बजावतात त्या भूमिकांची कालानुरूप केलेली फेररचना म्हणजे उदारीकरण असा ‘उदारीकरण’ या संकल्पनेचा वास्तवातील अर्थ. परंतु, उदारीकरण म्हणजे देशाच्या आर्थिक-औद्योगिक व्यवहारांमधून सरकारने आपले अंग पूर्णपणे काढून घेणे, असा एक विकृत अर्थ

दुर्दैवाने आजवर अनेक ठिकाणी स्वीकारला गेला. याचा साहजिकच परिणाम असा झाला की, उदारीकरण वा आर्थिक पुनर्रचना कार्यक्रम म्हणजे खुल्या, मुक्त बाजारपेठेला धुमाकूळ घालायला पूर्ण वाव, असे एक विपरीत समीकरण यातून रूढ झाले. मंदीचा झटका बसल्यानंतर सैरभैर झालेल्या समाजमानसाने या संकटामागील कारणांचा शोध घेताना उदारीकरणात अनुस्युत असलेल्या या मुक्ततेवरच ठपका ठेवावा यात अनैसर्गिक असे त्यामुळेच काही नाही. मंदीचा सामना करण्यासाठी सरकारनेच पुढाकार घेऊन भरभक्कम भांडवली गुंतवणुकीच्या योजना धडाक्याने राबवाव्यात, अशी जी मागणी वा गरज जोमदारपणे आज देशोदेशी व्यक्त केली जाते तिच्यामागे आजच्या आर्थिक अपरिहार्यतेइतकीच आर्थिक राष्ट्रवादाची सुप्त भावनाही आहे.

**वा-याची दिशा बदलते आहे...**

सरकारनेच धुरा सांभाळत पायाभूत सेवासुविधांच्या पुरवठ्यासाठी योजना हाती घेतल्या की आपोआपच देशांतर्गत उद्योगांच्या उत्पादनांना मागणी येते, देशी मनुष्यबळाला काम मिळते, बचतीच्या देशी प्रवाहाचे रूपांतर देशांतर्गत गुंतवणुकीत होते... असे हे साधे सरळ तर्कशास्त्र आहे. केवळ इतकेच नाही तर, सरकारने जाहीर केलेल्या 'पॅकेजेस्'चा लाभ घेणा-या उद्योगघटकांनी त्यांच्या सेवांचा लाभ प्राधान्याने देशी नागरिकांनाच करून द्यावा, अशा त-हेचा दण्डाही व्यवहारात लागू करण्याबाबत सरकारवर दबावही आणता येतो, हे दुसरे गणितही त्या मागे आहेच. ब्रिटिश सरकारने तयार केलेल्या 'पॅकेज'चा लाभ जे ब्रिटिश उद्योग घेत आहेत त्या उद्योगांमध्ये निर्माण होणारा रोजगार हा ब्रिटिश कामगारांनाच प्राधान्याने उपलब्ध झाला पाहिजे, ही ब्रिटनमधील कामगार संघटनांनी लावून धरलेली मागणी याच मानसिकतेची निदर्शक होय. फ्रान्समध्येही हेच चित्र दिसले. सारकोझी यांच्या सरकारने फ्रेंच वाहन उद्योगासाठी जे 'पॅकेज' तयार केले त्याचा लाभ घेणा-या उद्योगांना 'त्यांनी फ्रान्समध्येच वाहननिर्मिती केली पाहिजे', अशा प्रकारची अट घालण्यात यावी, असा सूर तेथेही उमटलाच. केवळ इतकेच नाही तर, या वाहननिर्मिती उद्योगांनी त्यांना लागणारे वाहनांचे सुटे भाग, उपकरणेही फ्रान्समधील पुरवठादार उद्योगांकडूनच खरेदी करावीत, अशा प्रकारचा दंडकही सरकारने जारी करावा अशीही मागणी तेथे पुढे आली.

या मानसिकतेचा विस्तार केवळ वस्तुनिर्माण उद्योगांपुरताच मर्यादित राहतो आहे, असेही नाही. वित्तीय संकटाचा फटका ज्या देशांतील बँकिंग क्षेत्राला बसला त्या देशांच्या सरकारांनी बँकांसाठी तयार केलेल्या 'पॅकेजेस्'नाही अशाच प्रकारचे कलम



लागू व्हावे, असा आवाज उठविला गेला. 'सब् प्राइम' कर्जांपायी गाळात गेलेल्या ज्या अमेरिकी बँकांचे पुनर्भांडवलीकरण करण्यासाठी सरकारने पुढाकार घेतला त्या बँकांनी अडचणीत असलेल्या अमेरिकी उद्योगांनाच काय तो भांडवलपुरवठा करावा आणि सरकारनेही त्या बाबतचा तसा आदेशच बँकांना जारी करावा, असा सूर तेथे प्रगटला. अशा प्रकारची भावना स्पेन, ग्रीस, ब्रिटन यांसारख्या देशांतही उमटली. सरकारी मदतीवर तरलेल्या बँकांनी कर्जपुरवठ्याबाबत स्वदेशी कर्जदारांनाच प्राधान्य दिले पाहिजे, अशी भूमिका या देशांत मांडली गेली. युरोपीय समुदायाची स्थिती तर फारच नाजूक बनते आहे. समूहाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार फक्त स्वदेशीचा हा धोशा आर्थिकदृष्ट्या हानिकारक ठरण्याबरोबरच चक्क बेकायदेशीरही ठरतो !

एकंदरच चित्र बघितले तर वा-याची दिशा बदलते आहे, अशी चिन्हे दिसतात. या सगळ्यामुळे मंदीचे चटके अधिकच तीव्र बनतील असा सावधानतेचा इशारा अनेक जण देताना दिसतात. तो खराही आहे. परंतु, त्याच्याकडे गंभीरपणे लक्ष देण्याच्या मनःस्थितीत मात्र आज फारसे कोणी दिसत नाहीत. मंदीच्या कवेत आलेल्या देशांना भांडवलाची चणचण भासते आहे. ती दूर होण्यासाठी त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरून भांडवलाचा पुरवठा होणे अत्यावश्यक ठरते. मंदीच्या या वातावरणात जोखीम पत्करण्याबाबत गुंतवणुकदारही अनुत्सुकच आहेत. खासगी भांडवलाच्या आंतरराष्ट्रीय प्रवाहांच्या सुकलेल्या अंगकाठीवरून या वास्तवाची प्रचिती येते. विकसित देशांकडून विकसनशील देशांकडे वाहिलेल्या खासगी भांडवलाच्या ओघाचे आकारमान २००७ साली चांगले ९२९ अब्ज डॉलर इतके होते. यंदा हाच आकडा १६५ अब्ज डॉलर इतका नीचांकी असेल, असे दिसते. गुंतवणूकयोग्य खासगी भांडवलाच्या या रोडावत्या प्रवाहाच्याच जोडीने उद्या देशोदेशीच्या बँकांनीही केवळ आपापल्या देशातील कर्जदारांसाठीच वित्तपुरवठ्याचा पसा ओणवा करावयाचा असा पवित्रा धारण केला तर काय परिस्थिती निर्माण होईल याची कल्पनाच केलेली बरी.

अशा प्रकारच्या संकुचित, बंदिस्त, संरक्षणवादी आर्थिक नीतीची तळी उचलणा-या मानसिकतेला खतपाणी मिळू देता कामा नये, असा आवाज आता संशोधक-अभ्यासकांच्या वर्तुळातून अधिक जोराने उमटू लागलेला दिसतो. अशा कडव्या आर्थिक राष्ट्रवादाचा परिपोष केल्याने मंदीचा विळखा उठण्यास पूरक ठरणा-या बाबींची उलट नाकेबंदीच होईल, असे प्रतिपादन वित्तीय धोरणकर्तेही करू लागलेले दिसतात. 'धरले तर चावते आणि सोडले तर पळते', अशी ही कोंडी आहे. ■■

मंदी - ३

# ‘मध्यम’मार्गाचा उतारा

कोणाला आवडो वा नावडो, ‘बाजारपेठ’ ही मोठी उपयुक्त आणि तितकीच विलक्षण चीज आहे यात वाद नाही. श्रम, भांडवल, कच्चा माल यांसारख्या उत्पादक घटकांपासून ते अक्षरशः हजारो प्रकारच्या वस्तू व सेवांच्या ‘ॲलोकेशन’चे काम बिनबोभाट करणारी हिच्याइतकी कार्यक्षम संस्था दुसरी नाही, हे वास्तव बाजारपेठेचे हाडवैरीही मान्य करतात. उदारीकरणात अनुस्युत असलेल्या खुल्या बाजारपेठीय नीतीवर बेतलेल्या धोरणांबाबत सध्याच्या मंदीमुळे नापसंतीचा सूर उमटत असल्याचे कानावर पडत असले तरी, सरकारचा वरचष्मा असलेल्या व्यवस्थेकडे वळणे हा त्यावरचा उपाय होऊ शकतो किंवा कसे यांबाबत मात्र साशंकताच व्यक्त केली जाते.

खरे म्हणजे, ‘खुली बाजारपेठ’ आणि ‘मुक्त बाजारपेठ’ या दोन्ही संकल्पनांमध्ये बरेचदा गल्लत केली जाते. या संज्ञा सर्रास समानार्थी वापरल्या जातात. तसे पाहिले तर या दोहोंमध्ये सूक्ष्म परंतु महत्त्वाचा फरक आहे. ज्या बाजारपेठेत उद्योगघटक, भांडवल यांचा प्रवेश आणि निर्गमन विनासायास, सहजपणे, कोणत्याही अडथळ्यांविना शक्य असते तिला ‘खुली बाजारपेठ’ असे सर्वसाधारणपणे संबोधले जाते. तर, ‘मुक्त बाजारपेठ’ या संकल्पनेमध्ये ‘सरकारी हस्तक्षेपापासून मुक्त’ अशी अर्थच्छटा अधोरेखित असते. पुन्हा गंमत अशी की, ‘मुक्त’ याचा अर्थ ‘अनिर्बंध’ असा अजिबातच नाही, हेही आपण ध्यानात घेत नाही. तसेच, ‘इंटरव्हेन्शन’ आणि ‘इंटरफिअरन्स’ या उभय इंग्रजी शब्दांना ‘हस्तक्षेप’ हाच एक मराठी शब्द वापरला जात असल्याने तर घोटाळा अधिकच वाढतो ! खरे म्हणजे, सरकारची (अनावश्यक) ‘लुडबूड’ आणि (आवश्यक तेथे) ‘हस्तक्षेप’ अशी शब्दयोजना परिस्थितीनुरूप तारतम्यानेच करावयास हवी.

हे एकदा का स्पष्ट झाले की, ‘मुक्त बाजारपेठ’ म्हणजे ‘अनिर्बंध बाजारपेठ’ अशी गफलत होणार नाही. मग, ‘उदारीकरण’ म्हणजे ‘अनिर्बंध बाजारपेठेचे साम्राज्य’ अशी दिशाभूलही टळावी. खुल्या बाजारपेठीय नियमांनुसार चलनवलन होणा-या आर्थिक व्यवहारांमधून सरकारने निवृत्त होणे म्हणजे ‘उदारीकरण’ नव्हे. तर, खुल्या बाजारपेठीय नियमांनुसार वर्तणा-या व्यवस्थेत आवश्यक असेल तेव्हा व गरज असेल तितपतच



सरकारने डोळस हस्तक्षेप करणे, हा उदारीकरणाच्या तत्वाचा गाभा होय. व्यवस्थेतील ज्या अनियमिततांमुळे खुल्या बाजारपेठीय यंत्रणेचे लाभ समाजाच्या विविध स्तरांतील समूहांना मिळण्यात अडचणी पैदा होतात त्या अडथळ्यांचे निवारण करण्यासाठी सरकारला हस्तक्षेप हा करावाच लागतो. उदारीकरणात ते अध्याहृतच आहे. मालमत्तेच्या वाटपातील विषमता, संधींच्या विभजनातील विषमता, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत सहभागी होऊन प्रगतीची गोड फळे चाखण्यापासून वंचित राखणा-या संरचनात्मक असमानता यांचे निराकरण करण्यासाठी सरकारने सक्रिय बनणे अपेक्षितच असते. ज्या कोणत्या कारणांपायी बाजारपेठेचा संकोच होईल अशा कारणांचे उच्चाटण हे उदारीकरणाच्या युगातील सरकारचे एक अगत्याचे कर्तव्य गणले जाते.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील खुल्या व्यापाराचा आग्रह हा याच भूमिकेतून धरला जातो. हा व्यापार अधिकाधिक खुला, विनाव्यत्यय वाहता राहावा याचसाठी उदारीकरणाचा पुरस्कार. कारण, व्यापारामुळेच बाजारपेठांचा विस्तार घडून येतो. आज मंदीमुळे असुरक्षिततेची भावना बळावलेल्या सामाजिक तसेच आर्थिक घटकांकडून मुक्त व्यापारावर पुन्हा एकवार निर्बंध जारी करण्याबाबतची भूमिका मांडली जात असली तरी व्यापार आणि बाजारपेठेचा विस्तार यांच्या अन्योन्य नात्याकडे दुर्लक्ष करणे उचित ठरणार नाही, परवडणार नाही असा जो सबुरीचा सल्ला दिला जात आहे त्याचा मथितार्थही ध्यानात घ्यावयास हवा. निर्बंधमुक्त व्यापाराच्या माध्यमातून देशोदेशीच्या बाजारपेठा परस्परांशी गुंफल्या जातात. साहजिकच, बाजारपेठ विस्तारते. बाजारपेठेचा विस्तार जितका अधिक, बाजारपेठेचे आकारमान जितके मोठे तितका श्रमविभागणीस असणारा अवसर विस्तृत. वेगवान आर्थिक प्रगतीचे सूत्र दडले असते ते नेमके इथेच.

श्रमविभागणी आणि उत्पादकता यांचे घनिष्ठ नाते असते. श्रमविभागणीद्वारे विशेषीकरणास वाव मिळतो. विशेषीकरणामुळे श्रमिकांची उत्पादकता वाढते. उत्पादकता वाढली की श्रमिकांना मिळणारा मेहेनताना उंचावतो. मेहेनताना उंचावणे याचाच अर्थ श्रमिकांची क्रयशक्ती वाढणे. वाढलेल्या क्रयशक्तीचे प्रतिबिंब बाजारपेठेतील सशक्त मागणीमध्ये पडते. मागणी वाढली की उद्योजक-उत्पादकांना बाजारपेठीय किमतींद्वारे ‘सिग्नल’ मिळतो. मग उत्पादक कंबर कसतात. गुंतवणूकयोग्य भांडवलाचा शोध सुरू होतो. गुंतवणूक विस्तारते. तिच्याच हातात हात गुंफून रोजगार वाढतो. रोजगार वाढला की क्रयशक्ती वाढते. वाढत्या क्रयशक्तीबरोबरच बाजारपेठ रुंदावते, व्यापार वाढतो, वाढत्या व्यापाराच्या जोडीनेच बाजारपेठांच्या कक्षाही विस्तारू लागतात ....आणि हाच

चक्रनेमिक्रम स्वयंपोषक बनतो. आर्थिक प्रगतीची चाके यातूनच गतिमान होतात. व्यापार, बाजारपेठ आणि क्रयशक्ती यांचे नाते हे असे परस्परावलंबी, परस्पराश्रयी असल्यामुळेच ग्राहकांच्या क्रयशक्तीचे सिंचन करणे, ही विकासाची कळ गणली जाते.

**मोठी मदार मध्यम वर्गावर**

आज मंदीचे जे संकट गहिरे बनते आहे ते नेमके बाजारपेठेत मागणी मलूल पडलेली असल्यानेच. त्याचमुळे, या मागणीचे पुनरुज्जीवन होण्यासाठी जंग जंग पछाडले जात आहे. साहजिकच, सारा भर आहे तो क्रयशक्तीचे संगोपन-संवर्धन करण्यावर, ज्या समाजसमूहांची क्रयशक्ती सक्रिय बनविता येईल अशा समूहांचा शोध घेण्यावर. आर्थिकदृष्ट्या मध्यम उत्पन्न गटात समाविष्ट असणा-या मध्यमवर्गीयांवर आज जगभरातील सगळ्यांचेच विशेष लक्ष आहे ते त्यामुळेच. याचे कारणही मोठे मजेशीरच आहे. वित्तीय अरिष्टाचे वादळ अमेरिकी अर्थव्यवस्थेत घुमू लागल्यावर देशोदेशीच्या भांडवल बाजारांत, शेअर बाजारांत त्याचे जे उत्पाती पडसाद उमटले त्याचा फटका त्या त्या समाजांतील सघन वर्गांनाच काय तो प्रथम आणि मुख्य करून बसला. कारण शेअर बाजारांत त्यांचाच पैसा होता. बाजारच कोसळल्याने त्यांच्या भांडवलाचे बाजारमूल्य घसरले. घरबांधणी क्षेत्रातही समाजाचा हाच स्तर देशोदेशी बिनीवर होता. घरांच्या घसरलेल्या किमतींची झळ, त्यामुळे, याच वर्गांना प्रकर्षाने जाणवली. तोंड पोळलेले असल्याने हा वर्ग आता ताकही फुंकून पिण्याच्याच मनःस्थितीत आहे. आर्थिकदृष्ट्या निम्न अथवा दुर्बल स्तरांतील समाजघटक या सगळ्यात पहिल्यापासूनच कोठेही नसल्याने वित्तीय अरिष्टातून निपजलेल्या पडझडीपासून ते आयतेच अस्पर्शित राहिले. मग आता खाली कोण उरले....तर मध्यमवर्गीय ! मंदीचा काच अंमळ सैलावण्यासाठी या मध्यम वर्गावरच आता सगळ्यांची मदार आहे.

त्यातही पुन्हा, मंदीने त्यातल्या त्यात अधिक गांजलेल्या पश्चिमी उद्योजकांचे डोळे खास करून लागलेले आहेत ते चीन, भारत, ब्राझील यांसारख्या उभरत्या अर्थव्यवस्थांमधील मध्यम वर्गाकडे. या मागील कारणही समाजाभ्यासकांच्या निरीक्षणाभ्यासावरच बेतलेले आहे. सातत्यशील आर्थिक प्रगतीस पूरक ठरणा-या अनेकानेक आणि पुन्हा परस्परपोषक बाबी मध्यम वर्गाचे संख्यात्मक प्राबल्य असणा-या देशांत मौजूद असण्याच्या शक्यता तुलनेने अधिक असतात, असा या संशोधनांचा निर्वाळा आहे. लोकतंत्रप्रधान राज्यप्रणाली, कुशल मनुष्यबळरूपी भांडवल, उत्पादक अशा पायाभूत सेवासुविधा, सुभग आणि लोकाभिमुख आर्थिक-सामाजिक धोरणे,



तुलनेने अधिक प्रमाणात असणारे राजकीय स्थैर्य, समाजाचा एकंदरच मॉडर्न असणारा तोंडवळा आणि जडणघडण, नागरीकरणाची उंचावलेली आणि उंचावणारी पातळी... यांसारख्या बाबी मध्यम वर्ग संख्येने चांगला भरभक्कम असणा-या देशांत नांदत असतात, असे अभ्यासकांचे निरीक्षण सांगते.

'मध्यमवर्गीय मूल्ये' वा 'मध्यमवर्गीय मानसिकता' हा अनेकदा कुचेष्टेचा, टिंगलीचा विषय ठरत असतो. मात्र, या मध्यमवर्गीय मूल्यव्यवस्थेतील काही अंशच, मध्यमवर्गीय मानसिकतेची काही वैशिष्ट्येच विकासाला अंतिमतः पूरक-पोषक ठरतात, असे या संदर्भातील काही अभ्यासांचे निष्कर्ष सांगतात. म्हणजेच, मध्यम वर्गाच्या संख्यात्मक बळाइतकेच त्याच्या मूल्यव्यवस्थेचेही माहात्म्य आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत मोलाची भूमिका बजावते. ग्राहकी वृत्ती हा या वर्गाचा विकासपूरक असा एक मोठाच विशेष. मात्र तो उधळा नसतो. बचतीचे उचित भान व मोल त्याला उमगलेले असते. हा वर्ग पर्यटनोत्सुक असतो. शिक्षणाला हा वर्ग अतिशय महत्त्व देतो. पुढील पिढीच्या शिक्षणाबाबत तो कमालीचा जागरूक असतो. दर्जेदार आरोग्य सेवा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण पदरात पाडून घेण्यासाठी खिशातून खर्च करण्याची त्याची तयारी असते. उत्पादक स्वरूपाच्या पायाभूत सेवासुविधा समाजात उपलब्ध व्हाव्यात या बाबत हा वर्ग आग्रही असतो. स्वतःमधील गुंतवणूक सतत वाढवत नेण्यासंदर्भात मध्यमवर्गीय माणूस कमालीचा दक्ष राहतो. आर्थिक प्रगतीस चालना देणारे या समाजगटाचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे खरेदी व उपभोगाच्या बाबतीत नवनवीन उत्पादने 'ट्राय' करून बघण्याची प्रयोगशीलता या वर्गाच्या ठायी प्रकर्षाने वास करीत असते.

विकसनशील देशांमधील मध्यम वर्गाची खरेदीबाबतची ही प्रयोगशीलता त्या त्या अर्थव्यवस्थेतील उद्यमशीलतेला खतपाणी पुरविते. ही या समाजगटाची सर्वांत मोठी 'कॉन्ट्रिब्यूशन' गणावयास हवी. नवनवीन उत्पादने वापरून बघण्याची या वर्गाची प्रवृत्ती नवनवीन वस्तू व सेवांच्या निर्मितीबाबतचे प्रयोग करून बघण्याची प्रेरणा उद्योजक-नवसर्जकांना देते. त्यातूनच नवनवीन प्रकल्प साकारतात. अशा नूतन प्रकल्पांच्या माध्यमातून गुंतवणुकीचे नवीन प्रवाह साकारतात. रोजगाराच्या नवनवीन संधी त्यातूनच निपजतात. रोजगारनिर्मितीबरोबरच ही प्रक्रिया रोजगाराचे वैविध्यीकरण होण्यास हातभार लावते. नवीन उत्पादनांच्या मिषाने नवनवीन तंत्रज्ञाने विकसित होतात. आगळ्या व्यवस्थापन प्रणाली साकारतात. एकंदरच उद्यमशीलतेला चालना मिळते. उद्यमशीलतेचे पोषण ही तर सातत्यशील विकासाची हमीच जणू ! ■■

मंदी - ४

# भिस्त उद्यमशीलतेवरच

कोणतीही गोष्ट ही संपूर्ण चांगली वा संपूर्ण वाईट कधीच नसते. प्रत्येकच बाबीला दोन बाजू असतात. आजची मंदीही या नियमास अपवाद नाही. प्रचलित अरिष्टाच्याही दोन बाजू आहेतच. एक वांछनीय तर दुसरी नकोशी. बंद पडणारे उद्योग-व्यवसाय, त्यापायी उद्‌भवणारी बेरोजगारी, बाजारातील अशक्त मागणी, तिच्यापायी हतबल झालेले उद्योजक, एकंदरच व्यवसायातील जोखीम वाढलेली असल्याने अवघड बनलेली भांडवल उभारणी, अनुत्सुक मनःस्थितीत असलेले भांडवलाचे पुरवठादार, न खपलेल्या मालाने भरलेली गोदामे.... ही सारी झाली मंदीची काळी बाजू. परंतु, याच परिस्थितीची दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. एकंदरच वातावरण मलूल आहे. मालाला उठावच नसल्याने किमतींची कमान उतरती दिसते. नवसर्जन करण्यास, नवनवीन वस्तू व सेवांच्या निर्मितीचे प्रयोग करण्यास त्यामुळेच सध्याचा काळ अनुकूल ठरतो. कारण अशा प्रयोगशीलतेचा खर्च सध्याच्या वातावरणात आटोक्यात राहणारा असाच असतो. नवसर्जन व्यवहारात आणण्यासाठी आवश्यक असणारी जागा तुलनेने स्वस्तात उपलब्ध होऊ शकते. मंदीच्या झळीत कोमेजून गेलेल्या उद्योगांमधून मुक्त झालेले भांडवल आणि श्रमशक्ती पुनर्वापरासाठी उपस्थित असते. तज्ज्ञ, प्रशिक्षित मनुष्यबळ चट्‌दिशी मिळू शकते... असे अनेक पैलू उद्यमशीलतेची ठिणगी प्रज्ज्वलित असलेल्या नवसर्जकांना पूरक ठरतात. त्यामुळे, प्रस्थापित उद्योगांना आजमितीस जगभरच नानाविध अडचणींचा सामना करावा लागत असला तरी नवसर्जक उद्यमशीलतेला मात्र एका अर्थाने भूमी नांगरलेली आहे. मंदीवर मात करण्याच्या शक्यता या नांगरटीमधूनच अंकुरतील अशी देशोदेशीच्या निरीक्षकांची धारणा आहे.

जागतिक पातळीवरही एकंदरच मानवी समाज आज प्रगतीच्या ज्या टप्प्यावर उभा आहे तो टप्पाही नवसर्जनाच्या पोषणास अनुकूल असाच आहे. आजचे युग हे माहितीचे आणि त्याही पलीकडे जाऊन ज्ञानाचे युग आहे. आर्थिक विकासाची प्रक्रियाच वेगाने अधिकाधिक ज्ञानकेंद्रित बनते आहे. कॉम्प्युटर आणि दूरसंचार हे



प्रगतीच्या या यात्रेतील आघाडीचे शिलेदार आहेत. या दोन्ही क्षेत्रांमध्ये नवसर्जनास उदंड वाव आहे. त्यातच, जगभरातील प्रगत अर्थव्यवस्था या उत्तरोत्तर सेवाप्रधान बनत आहेत. वस्तुप्रधान उद्योगप्रणालीपेक्षा सेवाप्रधान उद्योगव्यवस्था अधिक लवचीक गणली जाते. सेवाउद्योग घटकांचे आकारमानही वस्तुउद्योग घटकांच्या तुलनेत बरेच सुटसुटीत असते. सेवाउद्योगांची निर्मिती वा स्थापनाही तुलनेने तशी लवकर करता येते. नवसर्जक उद्यमशीलतेचे भरणपोषण सुलभपणे घडून येण्यास उपकारक असेच हे सारे वातावरण होय.

आजच्या ज्ञानप्रधान अर्थव्यवस्थेत नवसर्जनाचे मोलही पूर्वीच्या तुलनेत अनेक पटींनी वाढलेले आहे. 'नवसर्जन' या संकल्पनेचे सारे आयाम आजच्या व्यावसायिक पर्यावरणात कळीचे ठरताना दिसतात. नवनवीन वा अपूर्व अशा प्रकारच्या वस्तू व सेवा निर्माण करणे, नवनवीन उत्पादक घटकांचा शोध लावणे, नवीन तंत्रज्ञान वा उत्पादन पद्धती विकसित करणे, उपलब्ध असलेल्या पारंपरिक उत्पादक घटकांचीच फेरजुळणी करून अधिक मूल्यनिर्मिती साधणे हे नवसर्जनाचे चार पैलू सर्वसाधारणपणे मानले जातात. या चारही अंगांनी नवसर्जनाचे विकसन होण्यास तंत्रशास्त्रीय प्रगतीनेही खूप मोठा हातभार आज लावलेला दिसतो. पर्सनल कॉम्प्युटर, मोबाइल फोन आणि इंटरनेट या तीन चीजांनी नवसर्जनाचे आजवर 'एक्स्क्लुझिव्ह्' समजले जाणारे क्षेत्र सर्व स्तरांतील उद्यमशीलतेसाठी खुले केले आहे. एक प्रकारे नवसर्जनाचे हे लोकशाहीकरणच म्हणा ना ! या अशा घडामोडींमुळे मंदीवर मात करण्याच्या शक्यता बळकट बनत असल्याचे या क्षेत्रातील अनुभवी अभ्यासकांचे प्रतिपादन आहे.

बांगला देशातील मोबाइल फोन उद्योजक महिलांचे एकच उदाहरण वानगीदाखल इथे पुरावे. इक्बाल कादिर आणि महंमद युनूस यांच्या संयुक्त कल्पकतेमधून साकारलेली ही अफलातून कल्पना. बांगला देशात पाळेमुळे रुजलेले इक्बाल कादिर अमेरिकेला गेले आणि एक यशस्वी 'इन्व्हेस्टमेन्ट बँकर' बनले. मोबाइल फोन आपल्या मायभूमीत रुजला पाहिजे हे कादिर यांचे स्वप्न. उराशी जपलेल्या आपल्या या स्वप्नात कादिर यांनी ग्रामीण बँकेच्या कल्पनेचे जनक असणा-या महंमद युनूस यांना भागीदार बनविले. गाय खरेदी करण्यासाठी जर ग्रामीण बँक महिलेला कर्ज देऊ करते तर कर्जाची तशीच सुविधा मोबाइल फोन खरेदी करण्यासाठी का मिळू नये, हा साधा सवाल कादिर यांनी युनूस यांच्या पुढ्यात टाकला मात्र... आणि नवसर्जक उद्यमशीलतेच्या अक्षरशः लक्षावधी शक्यतांचे बीजारोपण तिथे झाले. एक नवीनच स्फुल्लिंग चेतले. ग्रामीण

बँकेने ती कल्पना उचलून धरली. आजमितीस बांगला देशात जवळपास तीन लाखांच्या आसपास मोबाइल फोन उद्योजक महिला कार्यरत आहेत. नेहेमीच्या बॅटरीपेक्षा अधिक आयुष्य असलेल्या बॅटरीने युक्त अशा मोबाइल फोनचे खास तयार केलेले एक 'किट्' खरेदी करण्यासाठी ग्रामीण बँकेने कर्जाची योजना तयार केली. उद्यमशील महिलांनी कर्जे घेऊन ती 'किट्स्' विकत घेतली. आता, ग्रामीण भागांतील रहिवासी व उद्योजक-व्यावसायिकांना मोबाइल फोनची सुविधा ('टॉक टाइम'च्या सशुल्क विक्रीद्वारे) या महिला उद्योजक आज पुरवत आहेत.

**फरक दोन मेंदूंमधील...**

नवसर्जक उद्यमशील व्यक्तीची मानसिक जडणघडणच मंदीच्या सध्याच्या संकटाशी दोन हात करण्यास सर्वाधिक उपयुक्त ठरेल, असा मानसशास्त्रासह मेंदूवर्तनशास्त्राच्या अभ्यासकांपर्यंत विविध तज्ज्ञांचा दावा आहे. नवसर्जकांचे मनोव्यापार, त्यांची मनोरचना आगळी असते, असे या संशोधकांचे प्रतिपादन होय. यांच्या मते, नवसर्जकाचे सर्वांत मोठे भांडवल, बलस्थान म्हणजे त्याचा प्रचंड आत्मविश्वास. जबर आत्मविश्वासाचे नवसर्जकाच्या ठिकाणी असणारे अक्षय भांडार हीच त्याची जणू अभेद्य कवचकुंडले. अपयश पचविण्याचे मनोबळ तो त्यातूनच मिळवतो. कितीही संकटे उद्भवली तरी आपले स्वप्न वास्तवात उतरविण्यासाठी पेलावी लागणारी जोखीम स्वीकारण्याची सोशिकता या दुर्दम्य आत्मविश्वासातूनच नवसर्जक उद्योजकास मिळत जाते. 'नवसर्जक' आणि 'व्यवस्थापक' यांच्यात हाच मूलभूत फरक असल्याचे या संदर्भातील मेंदू संशोधन सांगते. उच्च तंत्रज्ञानाधारित किमान दोन उद्योग स्थापन केलेले १६ नवसर्जक आणि उच्चपदस्थ एकूण १७ व्यवस्थापक यांच्या मेंदूवर्तनाबाबतच्या तौलनिक अभ्यासाचे केंब्रिज विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी काढलेले निष्कर्ष मोठे मननीय आहेत. तर्कशुद्ध विचारांती निर्णय घेण्याची प्रक्रिया व त्या वेळी मेंदूमध्ये होणा-या क्रिया या दोन्ही गटांमधील सदस्यांच्या बाबतीत एकसारखाच असल्याचे आढळून आले. परंतु, धाडसी तसेच 'रिस्की' निर्णय घेण्याच्या वेळी मात्र व्यवस्थापकांच्या तुलनेत नवसर्जकांचे मेंदू अधिक धिटाईने कार्यरत बनल्याचे प्रकर्षाने दिसले.

सध्याच्या आर्थिक अरिष्टाचे मूळ हे अमेरिकी वित्तीय धुंदीमध्येच असले तरी या संकटातून बाहेर पडण्यासही अमेरिकी मातीतील नवसर्जक उद्यमशीलतेचा वस्तुपाठच जगाच्या मदतीला येईल, असाही एक दृष्टिकोण आताशा मांडला जातो आहे. 'नवसर्जनाची खाण वा मायभूमी' हा अमेरिकेचा पूर्वापार असलेला डिंडिम



आजही कायम आहे. एका अभ्यासानुसार, १९९६ ते २००४ या कालावधीदरम्यान अमेरिकेत दर महिन्याला सरासरी तब्बल साडेपाच लाख लहान वा छोटेखानी उद्योग-व्यवसाय आकारास येत होते. यापैकीच अनेक उद्योग पुढे अल्पावधीतच मोठे आकारमान धारण करीत. नवसर्जनशीलता अमेरिकी मातीतच भिनलेली आहे. तिथूनच ती अमेरिकी माणसांच्या रक्तात झिरपते, असा या क्षेत्रातील अभ्यासकांचा दावा आहे. व्यवस्थापकीय भांडवलशाहीकडून नवसर्जनशील उद्यमशीलतेकडे अमेरिकी अर्थव्यवस्थेचा प्रवास १९७०च्या दशकाच्या शेवटाशेवटासच सुरू झाला. कॉम्प्युटर आणि वित्तीय सेवा या दोन उद्योगक्षेत्रांतील नवसर्जनाने स्थित्यंतराचा हा प्रवास आणि त्यातून निपजणारी विकासाची प्रक्रियाही तितकीच नवसर्जक आणि उद्यमशील बनविली.

अर्थव्यवस्थेतील हे पायाभूत अवस्थांतर अमेरिकेत तुलनेने सोपे गेले याला कारणही पुन्हा अमेरिकी मानसिकताच होती. नवसर्जनशीलतेला पूरक अशा या मानसिकतेच्या मुख्य विशेषांची जंत्रीही मोठीच उद्बोधक ठरावी. मुळात, अमेरिकी नवसर्जकांच्या उद्यमशीलतेच्या रोचक कहाण्यांचे बाळकडू पीतपीतच अमेरिकी बाळे मोठी होतात. अगदी शालेय वयापासूनच त्यांना नवसर्जकांच्या यशापयशाच्या गाथा सांगितल्या जातात. या प्रक्रियेत माध्यमेही मागे नसतात. नवसर्जनाच्या कडूगोड कथांचे प्रसारण विविध माध्यमांद्वारे आवर्जून केले जाते. फसलेले नवसर्जन हाही अखेर काही तरी शिकवून जाणारा मौल्यवान धडाच असतो, ही भूमिका अशा प्रचार-प्रसारामागे जोपासलेली असल्याचे प्रत्ययास येते. सर्वसामान्य अमेरिकी नागरिकाचा आपल्या दोन हातांत दडलेल्या निर्मितीक्षमतेवर असणारा गाढ विश्वास, हा झाला या मानसिकतेचा तिसरा पदर. उद्योगात अपयश येणे हा अमेरिकी मूल्यव्यवस्थेत कुचेष्टेचा विषय गणला जात नाही, हे अतिशय महत्त्वाचे तत्त्व इथे ध्यानात घेण्यासारखे आहे. व्यवसायात अपयश येणे हे काही देशांत जणू एक प्रकारे सामाजिक मरणच गणले जाते. अमेरिकी व्यवस्थेत दिवाळखोरीत निघालेल्या नवसर्जकाला असा कोणताही डाग चिकटत नाही. जोखीम घेण्याची प्रवृत्ती हा अमेरिकी मानसिकतेचा नवसर्जनपूरक आणखी एक विशेष. अतिशय विकसित अशी 'व्हेन्चर कॅपिटल'ची संस्थात्मक रचना कार्यरत असल्याने नवसर्जनाला अमेरिकेत भांडवलाची चणचण भासत नाही. उद्योग क्षेत्र आणि विद्यापीठे यांच्यातील प्रगाढ साहचर्य आणि स्थलांतरितांप्रती स्वागतशील दृष्टिकोण हे झाले या जंत्रीतील शेवटचे दोन पैलू.

मंदीवर मात करण्याची ही नऊ कलमी आचारसंहिताच नाही का ! ■■

मंदी - ५

# पूर्वेचा तारा

आजच्या ज्ञानाधिष्ठित जगात आर्थिक विकासाची एकंदरच प्रक्रिया नवसर्जनप्रधान बनत असल्याने नवसर्जक उद्यमशीलतेच्या वाढीस पोषक-उपकारक धोरणे वा कारक घटक जगाच्या कानाकोप-यांत कमी-अधिक प्रमाणात कार्यप्रवण होत असल्याचे अनुभवास येते. अर्थतज्ज्ञांपासून ते माध्यमांपर्यंत सगळेच घटक यामध्ये आपापल्या परीने आपापली भूमिका बजावत आहेत. मुळात, आर्थिक प्रगतीविषयक विश्लेषण-विवेचनातही आताशा नवसर्जनाचा मुद्दा केंद्रवर्ती बनतो आहे. जमीन, भांडवल आणि श्रमशक्ती या पारंपरिक उत्पादक घटकांचा समन्वय प्रत्यक्ष उत्पादन प्रक्रियेमध्ये साधणारा नवसर्जक उद्योजक हाच, माहितीच्या विद्यमान युगात, विकासाचा प्रधान प्रेरक आहे, अशा प्रकारची भूमिका ठिकठिकाणचे अर्थतज्ज्ञ उच्चरवाने मांडत आहेत. आपल्या या मताच्या पुष्ट्यर्थ नानाविध अभ्यास हाती घेत आहेत. जगभरातच गेल्या सुमारे दोन ते अडीच दशकांदरम्यान प्रवाही बनलेल्या आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमामुळे रोजगाराच्या जडणघडणीतच जे मूलभूत स्वरूपाचे बदल अनुभवास येत आहेत, त्या बदलांचीही नवसर्जनशीलतेच्या विकास-विस्तारातील भूमिका मोलाची ठरते आहे.

एकंदरीने विचार केला तर नोकरीची शाश्वती, कायमस्वरूपी नोकरी, स्थिर अशा कायमस्वरूपी नोकरीमध्ये अनुस्युत असणारी सुरक्षितता या बाबी आता हळूहळू कालबाह्य बनत चालल्या आहेत. 'अरे अमुकतमूक एकदाचा नोकरीला चिकटला बरं का', अशी भाषाही आता वापरातून हद्दपार होताना दिसते. श्रमांच्या बाजारपेठेतील गुणात्मक बदलांचा वेगही असा झपाट्याचा आहे की, नोकरी करणारा आणि त्याला नोकरी देणारा या उभयतांमध्ये जुन्या काळात असणारे भावनिक बंधही विसविशीत होत असल्याचा अनुभव सर्वत्र येतो आहे. नोकरी देणा-याने कायमस्वरूपी नोकरीच्या रूपाने स्थैर्याची हमी द्यावयाची आणि त्या बदल्यात नोकरी करणा-याने नोकरीप्रती अभेद्य निष्ठा व्यक्त करावयाची हे समीकरण आता मोडीत निघते आहे. एके काळी, सर्वसाधारण अमेरिकी नोकरदार वयाची पासष्टी गाठेपर्यंत फार फार तर चार वेळा नोक-या बदलायचा. ही गोष्ट १९६०च्या दशकातील. आजचे चित्र असे आहे की,



तिशीला हात लागेपर्यंतच तब्बल आठ वेळा नोकरी बदललेली असते ! नोकरीतील स्थैर्याबाबतच्या अशा अनिश्चिततेपायीच स्वतःमधील सर्जनशीलतेवर विसंबण्याची मानसिकता सर्वत्रच वाढत असल्याचे दिसते.

नवसर्जक उद्यमशीलतेकडे झुकत असलेल्या या कलाला संस्थात्मक मान्यता आणि आधाराचा टेकूही मिळतो आहे. व्यावसायिक तसेच व्यवस्थापकीय शिक्षण देणा-या संस्थांमध्ये नवसर्जनशीलतेविषयीच्या अभ्यासक्रमाचा अंतर्भाव आता पायाभूत मानला जातो आहे. हार्वर्ड बिझनेस स्कूलसारख्या जगविख्यात संस्थेनेही अलीकडे नवसर्जक उद्यमशीलतेबाबतचे अध्ययन पायाभूत अभ्यासक्रमात समाविष्ट केले आहे. नवसर्जनशीलतेच्या विविध परिमाणांचे अध्ययन-अध्यापन करण्याची सुविधा असणा-या विद्यापीठीय अध्यासनांच्या संख्येतही अलीकडील काळात लक्षणीय वाढ घडून आल्याचे संबंधित आकडेवारीवरून स्पष्ट होते. अमेरिकेतील विद्यापीठांमध्ये कार्यरत असणा-या अशा अध्यासनांची संख्या १९९९ ते २००३ या अवघ्या चार-पाच वर्षांच्या कालावधीतच २३७ वरून ४०६ वर पोहोचली. तर, जगभरात अन्यत्र याच संख्येत २७१ वरून ५३६ पर्यंत वाढ घडून आली.

नवसर्जनशील उद्योजकतेच्या प्रचार-प्रसारात माध्यमेही अग्रेसर बनत आहेत. ठिकठिकाणी सक्रिय असलेल्या नवसर्जकांच्या उपक्रमांना व्यापक स्तरावर प्रसिद्धी देणारे अनेक कार्यक्रम नामांकित वाहिन्यांवरून आवर्जून प्रसारित करण्याबाबत अनेक देशांत आताशा सकारात्मक उत्साह दृग्गोचर होतो. माध्यमांच्याच जोडीने सरकारी पातळीवरूनही नवसर्जकांवर कृपाकटाक्षांची बरसात होत असल्याचा अनुभवही येतो आहे. नवसर्जनास प्रेरणा देणारी धोरणे, कायदेकानू, नियमावली, वित्तपुरवठा - खास करून 'व्हेन्चर कॅपिटल' - यांसारख्या प्रांतांत वेगाने निर्णय घेण्याबाबत देशोदेशीच्या सरकारांमध्ये अलीकडे विशेष सतर्कता दृष्टीस पडते. विविध पातळ्यांवर समांतर पद्धतीने होत असलेल्या अशा प्रयत्नांमुळेच देशोदेशीच्या उद्यमशीलतेस प्रोत्साहन मिळून नवसर्जकांच्या हिकमतीद्वारे मंदीचे मळभ विरण्याच्या दिशा उजळतील असा आशावादवजा अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.

आशिया खंडातील उभरत्या अर्थव्यवस्था आणि त्यातल्या त्यात चीन व भारत या दोन उदयोन्मुख आर्थिक महासत्ता या प्रक्रियेमध्ये कर्णधाराची भूमिका बजावतील अशी एक भूमिका सध्या मांडली जाते आहे. चीन व भारत या दोन महाकाय अर्थव्यवस्थांनी १९८०च्या दशकात आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची मुहूर्तमेढ

रोवल्यापासून या उभय देशांमधील सुप्त सर्जनशील उद्योजकतेला आवश्यक तो वाव मिळाण्यास अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असल्याचे तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. या दोन्ही देशांच्या अर्थव्यवस्थांची अंगभूत वैशिष्ट्ये आणि पुनर्रचना कार्यक्रमादरम्यान या देशांच्या सरकारांनी आखली-राबविलेली धोरणे यांचा एकत्रित परिपाक देशांतर्गत उद्यमशीलतेला जोमदार धुमारे फुटण्यात होऊन त्यामुळे उजळलेला पूर्वेचा ताराच मंदीच्या विळख्यातून सुटकेचा प्रकाश प्रसवेल, असे एक अनुमान वर्तविले जाते.

आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचे ऐलान १९९१ साली केल्यापासून भारतातील 'परमिट राज' ओसरूसन भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल व्यावसायिक उद्यमशीलप्रधान अर्थव्यवस्थेकडे सुरू झाली. अमेरिकेत शिकून-सवरून आलेल्या तसेच, 'अ-निवासी भारतीय' या नात्याने अमेरिका-युरोपादी विकसित देशांमध्ये व्यावसायिक कारकीर्द घडविलेल्या भारतीय उद्योजकांनी या नवसर्जनशीलतापूरक वातावरणाचा लाभ उठविण्यात पुढाकार घेतला. आर्थिक सुधारणांमुळे पालटू लागलेल्या व्यावसायिक वातावरणाकडे आकर्षित होऊन परदेशस्थ अनेक भारतीय मायदेशी परतू लागल्याने 'ब्रेन ड्रेन'ऐवजी 'ब्रेन गेन'चा अनुभव येऊ लागला. हा बदललेला प्रवाह भारतीय नवसर्जनशीलतेच्या दृष्टीने दीर्घकालीन फायद्याचाच ठरेल, असे अभ्यासकांचे प्रतिपादन आहे. देशी 'कॉर्पोरेट' विश्वाला भासणारी अद्ययावत कौशल्यांची वानवा भरून निघण्याबरोबरच, अमेरिकी औद्योगिक व व्यावसायिक विश्वाशी भारतीय उद्योगक्षेत्राचे पूर्वापार असलेले संबंध अधिकच घनिष्ठ होण्यास यामुळे हातभार लागत आहे. उच्च शिक्षणाची भारतात असलेली मोठी परंपरा, व्यवस्था व संस्थात्मक रचना या सगळ्याच घडामोडींदरम्यान भारताच्या लेखी एक मोठाच 'ॲसेट' ठरत आहे.

चीनची परिस्थितीही जवळपास भारतासारखीच आहे. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाचा नारळ भारतापेक्षा तब्बल एक तप अगोदरच फोडल्याचा बराच फायदा चीनला मिळाला. सर्जनशील चिनी उद्योजकतेचे भरणपोषण करण्यात, भारताप्रमाणेच, अ-निवासी चिनी उद्योजक-नवसर्जकांचे योगदान प्रथमपासूनच मोलाचे ठरले. परदेशस्थ चिनी नवसर्जकांना मायदेशी आकर्षित करण्यासाठी चिनी राज्यकर्त्यांनी अक्षरशः युद्धपातळीवर प्रयत्न केले. कम्युनिस्ट पक्षाच्या प्रशिक्षण यंत्रणेद्वारे तर नवसर्जक उद्यमशीलतेचे प्रशिक्षण वर्ग चालविण्याचे कामही हाती घेतले गेले. या सगळ्याची परिणती उद्यमशीलतेची वाढ होण्यात झाल्याने मंदीवर कुरघोडी करण्याच्या जागतिक धडपडीला पूर्वेचा तारा प्रकाशदान करील अशी चिन्हे आज तरी दिसतात ! ■■



(पृष्ठ ४ वरून )

मर्यादित स्वरूपातच उपलब्ध असलेल्या कोळसा अथवा खनिज तेलासारख्या नैसर्गिक ऊर्जा साधनांचा सघन वापर करीत चष्कीत जीवन जगण्याच्या हव्यासापायी पर्यावरणाची किती अपरिमित हानी आपण करीत आहोत, याचे आपल्याला भान उरलेले नाही. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे आपली आजची दुरवस्था आहे. या भेसूर परिस्थितीतून बाहेर कसे पडावयाचे यांबाबत आज जे काही चिंतन-मनन सभोवताली चालू आहे त्याचे काही कण पानोपानी मांडले आहेत. आजच्या या दशेबाबत आणि उद्या येऊ घातलेल्या अवदशेबाबत जमले तर आपण विचार करावा ! वाचलेले विचार आचरणात आणण्याबाबत पुढे बघता येईल... !! ■■

## निवेदन

'अर्थबोधपत्रिके'मध्ये प्रकाशित करण्यासाठी संशोधनपर लेखन भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीकडे सादर करण्याकडे अलीकडील काळात कल वाढलेला दिसतो. जाणकार, विचक्षण वाचकांना 'पत्रिके'बाबत वाटणा-या आत्मीयतेची, 'अर्थबोधपत्रिके'च्या विश्वसनीयतेची, संशोधनपर वाचनसाहित्याला वाहिलेले गंभीर प्रकृतीचे एक नियतकालिक या 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रतिमेची जणू पावतीच त्याद्वारे मिळते. मात्र, अशा या लेखनसाहित्याचा अंतर्भाव 'पत्रिके'च्या अंतरंगात करण्यास आम्ही असमर्थ आहोत, याबद्दल सखेद दिलगिरी व्यक्त करण्याखेरीज पर्यायही नाही. एक तर, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेत कार्यरत असलेल्या संपादकीय विभागाने खास 'अर्थबोधपत्रिके'साठीच तयार केलेल्या मजकुराखेरीज अन्य मजकूर अंकात अंतर्भूत करावयाचा नाही, असे धोरण संस्थेने 'पत्रिके'च्या प्रारंभापासूनच जपलेले आहे. तसेच, देश वा राज्य पातळीवरील प्रचलित विषयांचा ऊहापोह करणारे संशोधनपर लेखन प्रकाशित करणारे संशोधनविषयक नियतकालिक, असे 'अर्थबोधपत्रिके'चे स्वरूपही संस्थेस आरंभापासूनच अभिप्रेत नाही. त्यामुळे, प्रकाशन हेतूने संस्थेकडे सादर करण्यात येणारे लेखन स्वीकारण्यास आम्ही असमर्थ आहोत. 'अर्थबोधपत्रिके'वर प्रेम करणारे वाचक संस्थेची ही भूमिका समजावून घेतील, त्याबाबत त्यांचा कोणताही विपरित ग्रह होणार नाही, अशी आशा नव्हे तर खात्री आहे. लोभ आहेच तो उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावा, हीच मनःपूर्वक प्रार्थना.

# आव्हान

"एकविसाव्या शतकात पृथ्वीवर मानवसमूहांचे अस्तित्व होते. या मानवसमूहांची प्रगती तोंडात बोटे घालावी अशीच होती. उपग्रहांमार्फत होणा-या दळणवळणाने पृथ्वीचे अवकाश व्यापले होते. संगणकांमुळे सर्व जण परस्परसंपर्कात होते, चिमुरड्यांच्या हातीही मोबाईल मावत होते. निळ्या आकाशात विमानांची गर्दी तर रस्त्यांवर मोटारींची व माणसांची गर्दी असायची. तसे जगाचे सर्व व्यवहार सुरळित चालले होते पण पृथ्वीचे पर्यावरण धोक्यात येऊ लागले होते. आपले अस्तित्व संपण्याचे इशारे मानवाला मिळू लागले होते. 'कळते पण वळत नाही' याला अनुसरून माणसे या इशा-यांकडे दुर्लक्ष करीत होती. अखेरीस त्या वाईट कालखंडाची सुरुवात झालीच. अतिशय प्रगत असणारे हे मानवसमूह नष्ट होण्याच्या मार्गाकडे वाटचाल करू लागले. या मार्गावरून त्यांना मागे फिरता आले नाही आणि हळूहळू मानवसमूहांचे अस्तित्व संपले. अब्जावधी नागरिकांपैकी बोटावर मोजता येतील अशी काही माणसे मंगळावर संशोधन करीत होती म्हणून ती वाचली आणि मंगळावरच्या आपल्या जीवनाची सुरुवात झाली." बाविसाव्या शतकात, मंगळावरील शाळेत, हा काल्पनिक धडा वास्तवात शिकविला गेला तर आश्चर्य वाटायला नको ! माणसांच्या प्रगतीचा वेग इतका वाढला आहे की क्षणभर थांबून विचार करण्यास त्यांना उसंत नाही. प्रगतीचे हे रूप, तिचा झपाटा, दिशा यांबाबत मुळापासूनच फेरविचार करण्याचे आवाहन पर्यावरणाशी संबंधित विविध अभ्यास मानवाला करीत आहेत. पण लक्षात कोण घेतो ? काही थोडके याचा विचार करून आपापल्या परी जमेल तशी पर्यावरणाची काळजी घेत आहेत. पण ते पुरेसे ठरणारे नाही. पर्यावरणाची हानी झाल्यामुळे उभ्या ठाकणा-या आव्हानापायी जगाची सुरक्षितता धोक्यात आली आहे. 'वसुंधरा दिन' आणि 'पर्यावरण दिन' दरवर्षी साजरा करण्याचा उपचार मनोभावे पार पाडणारे आम्ही विचार-उच्चारांकडून आचारांकडे कधी वळणार ! उक्तीपेक्षाही कृतीचे महत्त्व मनावर ठसावे याचसाठी पर्यावरणाच्या हानीमुळे गंभीर बनलेल्या परिस्थितीचे हे शब्दचित्र...

■■





# जगाची सुरक्षितता धोक्यात ?

पर्यावरणाच्या काळजीने सर्व जगाला ग्रासले आहे. पर्यावरणाची काळजी ही बाब फक्त पर्यावरणवाद्यांची राहिलेली नाही. विशेषतः, चालू शतकात 'इंटरगव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज'च्या (IPCC) अहवालाने तर अनेकानेक देशांमधील धोरणकर्त्यांना पर्यावरणाविषयी सचिंत बनविले आहे. यांत अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामा, नोबेल पुरस्कार विजेते माजी उपाध्यक्ष अल् गोर, फ्रान्सचे अध्यक्ष निकोला सारकोजी, ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर व विद्यमान पंतप्रधान गॉर्डन ब्राउन यांच्यासह जर्मनी, ऑस्ट्रेलिया व अन्य देशांमधील नेत्यांचाही समावेश आहे. युरोपीय समुदायातील देशांनीही या विषयाचा गांभीर्याने विचार करण्याचे ठरविले आहे. महत्त्वाचे म्हणजे त्यांची ही काळजी केवळ आपल्या देशापुरती वा आपल्या देशाच्या नागरिकांपुरती सीमित राहिलेली नाही. संपूर्ण जगाच्या सुरक्षिततेचा विचार त्यात जोडला गेला आहे. वैज्ञानिकांच्या अभ्यासांतून या विषयी तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली आहे. देशोदेशींच्या धोरणकर्त्यांमध्ये या विषयांची चर्चा चालू असली तरी त्यांच्या चर्चेमधून काही फलनिष्पत्ती होऊन त्याचे परिणाम त्यांच्या धोरणांत दिसतील किंवा कसे याबद्दल मात्र नेमकेपणाने सांगता येत नाही. पण नजीकच्या भविष्यात देशोदेशींच्या धोरणांत पर्यावरणाचा विचार मध्यवर्ती ठरण्याची गरज अधोरेखित झाली आहे. अर्थात त्यासाठी या विषयाचा अधिक सखोल व सर्वंकष अभ्यास होणे आवश्यक आहे.

वातावरणातील कार्बन डायॉक्साइडचे प्रमाण अलीकडे वाढत असून त्यामुळे पृथ्वीच्या तापमानात वाढ होत आहे. परिणामी, बर्फाळ प्रदेशातील बर्फ वितळून समुद्राच्या पाण्याच्या पातळीत वाढ होण्याची शक्यता आहे. ही वाढ झाल्याने समुद्रसपाटीपासून कमी उंचीवर असलेली बेटे, शहरे पाण्याखाली जाण्याची शक्यता वर्तविली जाते. या शहरांना वाचविण्यासाठी काय उपाययोजना कार्यान्वित कराव्यात, यांवर आता चर्चा होऊ लागल्या आहेत. वातावरणातील बदलाचे दुष्परिणाम परिसरविज्ञानावर, परिसंस्थांवर, जैविक विविधतेवर, जैविक साखळीवर आणि मानवी आरोग्यावर मोठ्या प्रमाणात होतील, असे अनेक अभ्यासांमधून सतत सांगण्यात येत आहे. त्यामुळे पर्यावरण व जागतिक सुरक्षा हे विषय परस्परांशी जोडले जात आहेत.

पर्यावरणामुळे मानवी समाजात संघर्ष झाल्याची तसेच दैनंदिन जीवनातील सुरक्षितता धोक्यात आल्याची उदाहरणे इतिहासातही आढळतात, असे काही अभ्यासकांनी स्पष्ट केले आहे. चौथ्या व पाचव्या शतकात जर्मनीतील टोळ्या व रोमन साम्राज्य यांच्यात संघर्ष झाला होता. आठव्या शतकात मुस्लिम साम्राज्याचा विस्तार पूर्वेकडे व दक्षिण युरोपच्या भागांत झाला, त्यामागे एक प्रमुख कारण मध्य आशियातील सततची दुष्काळी परिस्थिती हे असावे, असा अभ्यासकांचा कयास आहे. पंधराव्या शतकातील 'व्हायकिंग' या अतिशय लढाऊ जमातीचे अस्तित्व संपुष्टात येण्यामागे अल्पकाळासाठी अचानक थंड झालेले वातावरण व त्यामुळे आलेले Little Ice Age हे कारण असू शकते. चीनमधील तांग राजघराणे अस्तंगत होण्यामागे तसेच मध्य अमेरिकेतील मायन संस्कृती नष्ट होण्यामागे वातावरणातील बदल हे कारण असू शकेल, असेही म्हटले जाते. अल्पकालावधीत वातावरणात जर फार मोठे बदल घडून आले तर ते समाजजीवन संपुष्टात आणणारे ठरू शकतात, असेही अभ्यासकांना वाटते. २०५० पर्यंत जगाची लोकसंख्या सुमारे ९ अब्ज इतकी वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, वातावरणातील बदल हे एकाच पिढीच्या काळात घडून आले तर ते अधिक धोकादायक ठरू शकेल, अशी भीती व्यक्त करण्यात येऊ लागली आहे. म्हणून वातावरणातील बदलांमुळे होणारे पर्यावरणीय परिणाम अनेक विषयांच्या संदर्भात त्यातही अन्न व पाणी, ऊर्जा आणि आजारपणे व नैसर्गिक संकटे या तीन विषयांच्या संदर्भात अधिक महत्त्वाचे ठरतात.

**अन्न व पाणी प्रश्न गंभीर**

वातावरणातील बदलांमुळे अनेक ठिकाणी पावसाचे प्रमाण कमीजास्त होत असून तापमानातही चढउतार होत आहेत. त्यामुळे कृषिसंबंधित उत्पादनचक्रात काही बदल घडून येण्याची शक्यता वर्तविली जाते. विकसनशील देशांत लोकसंख्यावाढीचा प्रश्न आहे. वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज लक्षात घेऊन तेथे हरितक्रांतीवर भर देण्यात आला. पण आता हरितक्रांतीच्या मर्यादा लक्षात आल्या आहेत. त्यामुळे आता अन्नधान्याच्या उत्पादनात मोठी वाढ संभवत नाही. उलट, विकसनशील देशांमधील अन्नधान्याचे उत्पादन १९९०पासून स्थिरावले असल्याचे दिसते. तर याच काळात पूर, वादळे व नैसर्गिक आपत्ती यात काही प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते. या परिस्थितीत अन्नधान्याच्या मागणीत जागतिक पातळीवर वाढ झाली आणि त्या तुलनेत उत्पादनात वाढ झाली नाही तर अन्नधान्याच्या किंमतीत वाढ होणे हे स्वाभाविक ठरते. भरीस भर



म्हणजे, अन्नधान्याचे उत्पादन कमी, मागणी जास्त आणि साठाही बेताचा असे झाले तर जागतिक नागरिकांसाठी ही चिंतेची बाब ठरते. याशिवाय, अन्नधान्याच्या जागतिक पातळीवरील साठ्यात बरीच घट झाली आहे, असे काही अभ्यासक म्हणतात. येथे लक्षात घेण्यासारखी आणखीही एक बाब म्हणजे मक्यासारख्या काही पिकांपासून इथेनॉल हे जैवइंधन तयार करण्याचे प्रयत्न जोरात चालू आहेत. त्यामुळे माणसाला व जनावरांना खाण्यायोग्य असलेले पीक जैवइंधनाच्या चक्रात अडकले आहे. दुसरीकडे, रासायनिक खतांमुळे जमिनीची उत्पादकता कमी होत आहे. तसेच शहरीकरणाच्या प्रक्रियेत शहरविकासाशी संबंधित नवनवीन प्रकल्पांसाठी शेतजमिनी विकल्या जात आहेत. अशा परिस्थितीत अन्नधान्याचा पुरेसा साठा नसणे, अन्नधान्याच्या किंमती वाढणे, शेतीयोग्य जमिनींची उपलब्धता कमी होणे इत्यादी बाबींमुळे विविध देशांच्या समाजजीवनात अशांतता व अस्थिरता निर्माण होऊ लागण्याची शक्यता अधिक असते. या सर्व बाबींचा परिणाम राजकीय, आर्थिक बाबींसंदर्भात होणे स्वाभाविक ठरते. विशेषतः, विकसनशील देशांमधील कमी उत्पन्न गटांतील समाजगटांसाठी अशी सर्व धोरणे अधिक खोलवर परिणाम करणारी ठरू शकतात, असे म्हटले जाते.

वातावरणातील बदलांमुळे पावसाचे प्रमाण कमी झाले तर पाण्याचा तुटवडा असलेल्या ठिकाणी अधिक गंभीर परिस्थिती निर्माण होईल. पाण्याचा तुटवडा कमी-अधिक प्रमाणात असणा-या विविध देशांमध्ये आजमितीस सुमारे दोन अब्ज नागरिक वास्तव्य करून आहेत. तर, पिण्याच्या पाण्याची कमतरता व सांडपाण्याच्या अपु-या सोयी असणा-या नागरिकांची संख्याही भरपूर आहे. अशा वेळी पावसाच्या प्रमाणात झालेली अल्पशी घटदेखील पाण्याचे संकट तीव्र करण्यास कारणभूत ठरू शकते. याचे परिणाम जागतिक होऊ शकतात. आशियातील दरडोई पाण्याच्या उपलब्धतेत १९५० पासून आजपर्यंत सुमारे ४० ते ६५ टक्के घट झाल्याचे दिसते. २०२५ पर्यंत जगभरातील सुमारे ५ अब्ज नागरिकांना पाण्याच्या तीव्र संकटाला सामोरे जावे लागेल अशी भीती काही अभ्यासांमधून व्यक्त होते. यांतील लाखो नागरिकांचे पाण्याचे संकट हे वातावरणातील बदलाचे दुष्परिणाम म्हणून पुढे आलेले असेल. पाण्याचे संकट प्रत्येक देशात कसकशा प्रकारचे असेल, हे नेमकेपणाने सांगणे अवघड आहे. तथापि, अनेक देशांना या संकटाला तोंड द्यावे लागेल अशी चिन्हे आहेत. पृथ्वीच्या तापमानवाढीमुळे तिबेटमधील बर्फ वितळून काही प्रश्न निर्माण झाले आहेत. चीनमधील तज्ज्ञांच्या अंदाजानुसार तिबेटमधील बर्फ प्रतिवर्षी ७ टक्के या दराने वितळत आहे.

या बर्फामुळे वितळलेल्या पाण्याने खळाळून वाहणा-या नद्यांवर तिबेटमधील हजारो नागरिकांचे जीवन अवलंबून आहे. बर्फ वितळू लागल्याने सुरु वातीच्या काळात नद्यांना पूर येण्याची शक्यता असली तरी कालांतराने नद्यांची पाण्याची पातळी कमी होईल व त्यामुळे अन्नधान्याच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होईल. याचे परिणाम भारत, बांगलादेश, चीन, म्यानमार, थायलंड, लाओस, कंबोडिया आणि व्हिएतनाम इत्यादी देशांवरही होतील, असे म्हटले जाते. अशा परिस्थितीत पाण्याच्या प्रश्न संघर्ष निर्माण करणारा ठरूही शकेल, असे म्हटले जाते. उदाहरणार्थ, ब्रह्मपुत्रेच्या पाण्याचा वापर करून घेण्याबाबत चीनच्या सरकारची धोरणांमुळे भारत व बांगलादेश येथे तणाव निर्माण होऊ शकतो. जगभरात पाणीप्रश्न उग्र रूप धारण करेल व पाण्यावरून युद्धेही होतील, असे काही अभ्यासांमधून म्हणण्यात आले आहे.

**ऊर्जासुरक्षा**

वातावरणातील बदलांमुळे ऊर्जाविषयक धोरणांवर परिणाम होतील असे म्हटले जाते. ऊर्जाविषयक प्रश्न गुंतागुंतीचे आहेत. कोळसा विपुल प्रमाणात उपलब्ध झाल्याने गेली अनेक दशके कोळशापासून ऊर्जानिर्मिती करण्यात येत आहे. पण या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होते. याशिवाय, खनिज इंधनाचा वा जीवाश्म इंधनाचा (फॉसिल फ्युएल) वापर करूनही मोठ्या प्रमाणावर ऊर्जा मिळवली जाते. जीवाश्म इंधन वापरल्याने हरितगृह वायूंची निर्मिती होऊन पृथ्वीचे तापमान वाढण्यास मदत होते. या संदर्भातील 'क्योतो प्रोटोकॉल'प्रमाणे अनेकानेक देशांनी हरितगृह वायूंचे प्रमाण घटविले तरी चालू शतकात हरितगृह वायूंचे प्रमाण वाढण्याची शक्यता अधिक आहे. कारण, वाढत्या लोकसंख्येची अनेकानेक प्रकारच्या उत्पादनांची, वस्तूंची वा सेवांची वाढती गरज पूर्ण करण्यासाठी विविध देशांची धोरणे आखली जातील. त्यासाठी ऊर्जेची मागणी वाढणारच आहे. 'इंटरनॅशनल एनर्जी एजन्सी'च्या अंदाजानुसार २००५ पासून २०३०पर्यंतच्या काळात जगाची ऊर्जेची गरज ५५ टक्क्यांने वाढणार आहे. जीवाश्म इंधनांच्या मदतीने ही गरज पूर्ण करण्याचा प्रयत्न बहुसंख्य देश करतील, त्यामुळे हरितगृह वायूंचे उत्सर्जन अधिक प्रमाणात होईल. अशा परिस्थितीत चालू शतकात, पृथ्वीचे वाढते तापमान रोखायचे कसे, हा एक महत्त्वाचा प्रश्न बनून राहणार हे निश्चित. या संदर्भात तिसरा मार्ग अनुसरण्याचा म्हणजे अणुऊर्जेला प्राधान्य देण्याचा मुद्दा मांडला जातो. अणुऊर्जेच्या वापरातून वाढणारे वातावरणातील हरितगृह वायूचे प्रमाण जीवाश्म इंधनांच्या तुलनेत अतिशय अल्प आहे.



असे असले तरी अणुऊर्जेबाबत अनेक जण विविध प्रकारच्या शंका उपस्थित करतात. अणुऊर्जेवर सर्वांत मोठी टीका अशी केली जाते की, अणुऊर्जा निर्मितीसाठी प्लुटोनियम व युरेनियमची आवश्यकता असते आणि अण्वस्त्रनिर्मितीत त्यांचा उपयोग होत असल्याने अण्वस्त्रनिर्मितीचा धोका वाढतो. ही सर्व साधनसामग्री सुरक्षित ठेवणे हे एक मोठे आव्हान असते. या शिवाय अणुऊर्जानिर्मितीचा खर्चही फार मोठा असतो. भूगर्भातून युरेनियम मिळविणेही सोपे नसून युरेनियममुळे नागरिकांच्या आरोग्याला फार मोठा धोका निर्माण होतो. तरीही अणुऊर्जेचा पर्याय अनेक देश स्वीकारत आहेत, असे दिसते.

वातावरणातील बदल आणि ऊर्जाविषयक धोरणे व सुरक्षितता या विषयाची आणखी एक महत्त्वाची बाजू समुद्रातून मिळणा-या तेल व वायूशी संबंधित आहे. पृथ्वीचे तापमान वाढून बर्फाळ प्रदेशातील बर्फ वितळला तर समुद्रातील पाण्याच्या पातळीत वाढ होईल. त्यामुळे समुद्रसपाटीपासून कमी उंचीवर असलेली बेटे पाण्याखाली जातील. ही बेटे व समुद्रातील काही खडक हे महत्त्वाचे ठरतात ते देशोदेशींचे सागरी अधिकारक्षेत्र निश्चित करताना. आंतरराष्ट्रीय संबंधांचा विचार करताना सागरातील महत्त्वाच्या खुणांच्या आधारे असे अधिकारक्षेत्र निश्चित करणे गरजेचे ठरते. समुद्राच्या पाण्याची पातळी वाढून या खुणा नष्ट झाल्या तर काय करायचे, याचे उत्तर अद्याप कोणाकडे नाही. अशा वेळी राष्ट्राराष्ट्रांमधील संबंधात तेढ निर्माण होऊ शकते. सागरी किनारा असलेल्या देशांचे विशेष आर्थिक क्षेत्र (एसइझेड) हे बरेचदा समुद्र किना-याजीक असल्याचे आढळते. समुद्राशी संबंधित काही वाद निर्माण झाल्यास या क्षेत्रांवर त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो. चीननजीकच्या समुद्रात तेलाचे साठे असून त्या भागांत असलेल्या छोट्या बेटांमुळे आशियातील देशांच्या संदर्भात हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. बर्फाळ प्रदेशातील बर्फ वितळू लागल्याने आजपर्यंत तेथील बर्फाखाली दडलेली नैसर्गिक संपत्ती आता देशोदेशींच्या सरकारांना खुणावू लागली आहे. त्यामुळे ती मिळविण्यासाठी काही देश सक्रिय झाले आहेत. यामुळेही आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये ताणतणाव वाढू शकतात. रशिया, कॅनडा, अमेरिका, डेन्मार्क, नॉर्वे इत्यादी देश आता या संदर्भात गांभीर्याने विचार करीत आहेत.

**आजारपणे व नैसर्गिक आपत्ती वाढणार ?**

पर्यावरणाचा प्रश्न गंभीर झाल्याने अनेक प्रकारचे साथीचे आजार पसरू शकतात. तापमान वाढल्याने जगभरातील *(पृष्ठ ४४ वर पाहावे)*

# पर्यावरण - २

# असे देश, असे प्रश्न

पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे वातावरणात बदल होऊन पर्यावरणविषयक अनेक प्रश्न दिवसेंदिवस उग्र रूप धारण करू लागले आहेत. त्यामुळे मानवमूहाचा भविष्यकाळ उज्ज्वल नाही, हे आता ब-याच प्रमाणात स्पष्ट होऊ लागले आहे. विशेषतः, 'इंटर गव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज'च्या (IPCC) पर्यावरणविषयक अभ्यासाने या विषयाच्या अनेक बाजूंवर झोत टाकून विविध देशांमधील धोरणकर्त्यांना काळजीग्रस्त बनविले आहे. अन्न व पाणी यांचा तुटवडा निर्माण होऊन हे दोन मुद्दे येथून पुढे सर्वच देशांसाठी महत्त्वाचे ठरणार आहेत. सर्वच देशांमधील नागरिकांना एक प्रकारच्या असुरक्षित वातावरणाला सामोरे जावे लागणार आहे. त्याचप्रमाणे अनेक देशांमध्ये नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढून आरोग्यविषयक गंभीर समस्याही निर्माण होण्याची शक्यता आहे, असे इशारे अभ्यासांमधून मिळाले आहेत. कोणतेही तंत्रज्ञान येथे माणसाच्या मदतीला धावून येण्याची शक्यता सध्या तरी आढळत नाही. तसेच, राजकीय तोडगेही उपयोगी पडतील असे अभ्यासकांना वाटत नाही. या पार्श्वभूमीवर या संदर्भात विविध देशांसमोर कसे प्रश्न उभे ठाकू शकतात याकडे एक नजर टाकली तर काय दिसते, याचा ऊहापोह काही अभ्यासकांनी केला आहे. त्यांच्या मते दक्षिण व मध्य आशिया, आफ्रिका आणि युरोप येथील देशांना पृथ्वीच्या वाढत्या तापमानाच्या परिणामांच्या झळा अधिक प्रमाणात सोसाव्या लागणार आहेत.

**दक्षिण आशिया**

पृथ्वीच्या वाढत्या तापमानाचा मोठा फटका बसणार आहे तो दक्षिण, पूर्व व आग्नेय आशियातील देशांना. या देशांना सर्वांत मोठी समस्या भेडसावणार आहे ती वारंवार येणा-या पूरस्थितीशी कसा मुकाबला करायचा याची. त्यातही बांगला देशातील परिस्थिती अधिक गंभीर असेल. समुद्राच्या पाण्याच्या पातळीत झालेली वाढ आणि बर्फाळ प्रदेशातील वितळणा-या बर्फामुळे नद्यांना येणारे पूर या दोन कारणांमुळे या देशांतील नागरिक कोंडीत सापडण्याची शक्यता आहे. चक्रीवादळांचाही धोका तेथे आहेच. या शिवाय, येत्या काही दशकांत तेथील लोकसंख्याही वाढेल. नैसर्गिक आपत्तींमुळे नागरिकांना उदरनिर्वाहासाठी देशांतर्गत स्थलांतर करावे लागेल.राहण्यायोग्य



ठिकाणी स्थलांतर होते तेव्हा तेथील स्थानिकांची संख्या हा एक मोठा घटक विचारात घ्यावा लागतो. स्थानिकांचीच लोकसंख्या जेथे अधिक असते तेथे जर स्थलांतरित पोहचले तर स्वाभाविकच तेथील नैसर्गिक साधनसामग्रीवरील ताण वाढेल. काही नागरिक परदेशांत स्थलांतर करतील. यामुळे दक्षिण आशिया, पूर्व अशिया आणि युरोप येथे राजकीय ताण निर्माण होण्याची शक्यता दिसते. भारतालाही हा प्रश्न भेडसावेल. बांगला देशातून भारतात होणारी घुसखोरी हा भारतासाठी एक महत्त्वाचा राजकीय प्रश्न बनलेला आहेच. त्यातच तो पर्यावरणाशी जोडला गेला तर तो सोडविणे भारतासाठी अधिकच आव्हानाचे ठरणार आहे. येथेच आणखी एक संदर्भ विचारात घ्यावा लागतो तो इस्लामिक दहशतवादाचा. बांगला देशात काही प्रमाणात इस्लामिक दहशतवाद वाढीस लागला आहे आणि अशा परिस्थितीत या देशातील नागरी जीवन असुरक्षित बनले तर दहशतवादाला खतपाणी मिळण्यास मदतच होईल. दहशतवादी संघटनांच्या कारवायांचे जागतिक स्वरूप लक्षात घेतले तर दहशतवाद ही जागतिक समस्या ठरते आणि त्याचा धोका सर्वच राष्ट्रांना संभवतो.

लक्षात घेण्यासारखा आणखी एक मुद्दा असा की विकासाच्या महामार्गावर जाण्यासाठी एकीकडे जागतिक बँकेतर्फे अर्थसाहाय्य करण्यात येणा-या विविध विकास प्रकल्पांची गरज वाढते आहे; तर दुसरीकडे, त्याच वेळी अशा विकास प्रकल्पांची परिणामकारकता कमी होत आहे. म्हणजे, काही ठिकाणी नद्यांवर धरणे बांधण्याची कामे हाती घेण्यात आली पण पर्यावरणातील बदलांमुळे भविष्यात त्या नद्याच कोरड्या पडण्याची शक्यता वर्तविली जाते. तसेच, किना-यालगतच्या भागांत काही ठिकाणी पिके घेण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. पण, या भागांतील पूर वाढल्यास ही पिके पुरात वाहून जाण्याचा धोका आहे. पाण्याचा तुटवडा वाढण्याच्या या काळात जागतिक बँकेसारख्या संस्थांकडून पाणीपुरवठ्याचे खाजगीकरण करण्याचा मार्ग सुचविला जातो. पण त्यामुळे पाणी मिळविण्याचा खर्च वाढतो आणि गरीब देशांतील ग्रामीण भागांतील नागरिकांना/शेतक-यांना हे महागडे पाणी परवडत नाही. पण हेच महागडे पाणी शहरांतील नागरिकांना पैसे खर्च करून विकत घेता येते. त्यामुळे अनेक देशांमधील 'शहरी' व 'ग्रामीण' ही दरी रुंदावते. नेपाळमध्ये काही ठिकाणी पाण्यापासून वीजनिर्मिती करणारे प्रकल्प जागतिक बँकेच्या मदतीने उभे करण्यात आले. पण, पृथ्वीचे तापमान वाढल्याने बर्फ वितळून नद्यांना पूर येण्याच्या घटना घडल्या तर हे प्रकल्प अडचणीत येण्याची भीती आहे.

## आफ्रिका

वातावरणातील बदलांमुळे स्थलांतर करणा-यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढण्याचा अंदाज असून आफ्रिकेतील देशांना अशा घटनांना सामोरे जावे लागेल. देशांतर्गत व देशाबाहेर/आंतरराष्ट्रीय असे हे स्थलांतर असेल. ग्रामीण भागांतून शहरांकडे होणा-या स्थलांतरामुळे काही प्रश्न निर्माण होतील. दुष्काळ, वाळवंटीकरण इत्यादींमुळे आफ्रिकेच्या पश्चिमेकडील नायजेरिया हा देश फार अडचणीत येण्याचा अंदाज आहे. सध्या या देशातील १३५० चौरस किलोमीटर एवढी जमीन प्रतिवर्षी उजाड बनते आहे. लागोस हे समुद्रकिना-यावरील मोठे शहर असून समुद्रातील पाण्याची पातळी वाढली तर या शहराला मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जाते. नायजेरिया हा सर्वांत जास्त लोकसंख्या असलेला देश असून या देशातील तीन-चतुर्थांश नागरिक तिशीच्या घरातील आहेत. त्यामुळे नायजेरियातून होणारे स्थलांतर हा विषय राजकीय व आर्थिकदृष्ट्या वादग्रस्त ठरण्याची शक्यता दिसते. नायजेरिया हा तेल निर्यात करणारा देश असून तेलाच्या निर्यातीत तो जगात आठव्या क्रमांकावर तर आफ्रिकेतील एकमेव मोठा देश आहे. हा देश अस्थिर झाला तर त्याचे परिणाम तेलाच्या किंमतींवर होतील. त्यामुळे देशोदेशींच्या आर्थिक धोरणांवर त्याचा परिणाम होईल. अशा रीतीने एका देशातील पर्यावरणाच्या समस्या या आंतरराष्ट्रीय पातळीवर परिणाम करणा-या ठरू शकतात. पूर्व आफ्रिकेतील प्रश्नही अधिक गंभीर स्वरूपाचे ठरू शकतात. एका अभ्यासानुसार येत्या ३० वर्षांत पूर्व आफ्रिकेतील पावसाच्या प्रमाणात बरेच चढउतार होतील. त्यामुळे जमिनीची धूप मोठ्या प्रमाणावर होईल तसेच काही ठिकाणी पुरांमुळे हानी होईल, तर कधी पावसाचे प्रमाण घटून दुष्काळही पडेल. या भागांतील सुमारे ४० टक्के नागरिकांचे जीवन शेतीवर अवलंबून असल्याने त्यांचे दैनंदिन व्यवहार अडचणीत येतील. असे दैनंदिन व्यवहार अडचणीत आल्याने विविध समाजगटांमध्ये संघर्ष होतात. दारफूरमध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य वाढून नैसर्गिक संसाधनांवर ताण वाढल्याने तेथे वांशिक/धार्मिक संघर्ष निर्माण झाला होता.

## समृद्ध युरोपही त्रस्त होणार ?

आशिया व आफ्रिका येथील नागरिकांचे प्रश्न त्यांच्या भूमीपुरतेच सीमित राहतील असे नाही. आपला देश असुरक्षित बनला की आशियातील व आफ्रिकेतील नागरिक युरोपीय देशांमध्ये स्थलांतर करण्याचा प्रयत्न करतील ते दोन कारणांमुळे. काही युरोपीय देश समृद्ध आहेत हे एक कारण आणि युरोपीय देशांमधील जननदर



घटत असल्याने त्या देशांना विविध प्रकारची कामे करू शकणा-या 'वर्किंग फोर्स'ची आवश्यकता भासू शकेल हे दुसरे कारण होय. काही ना काही कारणाने स्थलांतर केलेल्या विविध देशांमधील नागरिकांना युरोपीय देशांनी आश्रय दिला आहे. त्यातही मुस्लिमधर्मियांची संख्या अधिक आहे. नेदरलँड्स्, जर्मनी, फ्रान्स, डेन्मार्क इत्यादी देशांमध्ये स्थलांतरित मुस्लिमांची संख्या अधिक आहे. हे स्थलांतरित तेथील समाजात सामावून न गेल्याने तेथे सांस्कृतिक/धार्मिक प्रश्न उद्‌भवतात. त्यातच इस्लामसमर्थक दहशतवादाचा धोका वाढल्याने युरोपीय देशांमध्ये स्थलांतरितांना विरोध होऊ लागला आहे. शिवाय, नैसर्गिक साधनसामग्रीवर येणारा ताण आणि स्थलांतरितांसाठी रोजगारनिर्मिती हे मुद्दे येथेही महत्त्वाचे ठरतात. त्यामुळे ज्या क्षेत्रांत परदेशांतील 'वर्किंग फोर्स'ची आवश्यकता भासते तेथेच फक्त स्थलांतरितांना अर्थार्जनाच्या संधी उपलब्ध होतात. अशा संधी न मिळाल्यास स्थलांतरितांमध्ये असंतोष निर्माण होतो. पॅरिसमध्ये झालेल्या दंगलीचे उदाहरण या संदर्भात बोलके ठरावे. अलीकडच्या काळात तर आर्थिक मंदीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे स्थलांतरितांना सामावून घेण्याचा प्रश्न अधिकच गंभीर ठरण्याची शक्यता आहे.

## मध्य आशिया

नजीकच्या भविष्यात पाण्याच्या तुटवड्याचा प्रश्न मध्य आशियातील देशांनाही मोठ्या प्रमाणावर भेडसावणार असून या काळात या देशांतील लोकसंख्याही वाढती असणार आहे. त्यामुळे तेथील पाण्याची मागणी वाढणार आहे. मध्य आशियातील ७५ टक्के पाणीसाठा इराण, इराक, सीरिया आणि तुर्कस्तान या देशांमध्ये आहे. त्यामुळे मध्य आशियातील राजकारण लक्षात घेता हा प्रश्न व तसेच तेथील राजकारण गुंतागुंतीचे बनत जाणार आहे. अभ्यासकांनी या भूप्रदेशाला आणि तेथील राजकीय प्रश्नाला 'हायड्रोपोलिटिकल सिक्युरिटी कॉम्प्लेक्स' असे संबोधले आहे. तुर्कस्तानातील पाणीप्रकल्पविषयक कामकाज वेगात चालू असल्याने या राजकारणात तुर्कस्तानचे पारडे जड असण्याची शक्यता दिसते. इस्रायलला मात्र पाण्याचा तुटवडा मोठ्या प्रमाणावर जाणवणार आहे. इस्रायल व पॅलेस्टाइन यांच्यात ज्या भागांत संघर्ष चालू आहे तेथेच इस्रायलला मिळणा-या पाण्याचे स्रोत आहेत. या सर्व विवेचनावरून असे दिसते की पर्यावरणविषयक प्रश्नांना कसे भिडायचे, हाच मुळी आजमितीस एक मोठा प्रश्न बनला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संस्थांची भूमिका येथे महत्त्वाची ठरू शकेल का, याचा विचार करणे भाग पडते. ■■

पर्यावरण - ३

# आव्हाने पेलण्यासाठी...

भविष्यकाळात पर्यावरणविषयक प्रश्न गंभीर होत जातील आणि ते अनेकानेक देशांना आपल्या कवेत घेतील, असे आताचे चित्र दिसते. हे प्रश्न फक्त संबंधित देशांपुरतेच मर्यादित राहणार नाहीत आणि आंतरराष्ट्रीय जनसमुदाय त्यात ओढला जाण्याची शक्यता अधिक आहे. अशा परिस्थितीत अनेक देश आंतरराष्ट्रीय संस्था/संघटनांकडे मदत मागू शकतात. त्यामुळे या संदर्भात या संस्थांचे कार्य अधिक महत्त्वाचे ठरू शकेल.

## संयुक्त राष्ट्र संघटना

येथे पहिले नाव घेता येईल ते संयुक्त राष्ट्र संघटनेचे. पर्यावरणीय संकटांमुळे निर्माण झालेले विस्थापितांचे/स्थलांतरितांचे प्रश्न, नैसर्गिक संकटांमुळे अडचणीत सापडलेल्यांना देण्यात येणा-या अन्न व इतर मदतीचे वाटप, या आणि अशाच अन्य बाबींसंदर्भात राष्ट्रसंघाचे काम गरजेचे ठरते. राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेचे कार्यही येथे महत्त्वाचे ठरते. पृथ्वीच्या वाढत्या तापमानाला कारणीभूत ठरणा-या वातावरणातील कार्बन डायॉक्साइडचे प्रमाण कमी करण्यासाठी कृतीयोजना सुचविणा-या 'क्योतो प्रोटोकॉल'ची अंमलबजावणी करण्याबाबत राष्ट्रसंघ महत्त्वाची भूमिका बजावू शकेल. पर्यावरणविषयक प्रश्न जसजसे गंभीर रूप धारण करतील तसतसे त्याबाबतची कृतीयोजना राबविली जावी, अशी मागणी आंतरराष्ट्रीय पातळीवर केली जाईल. यावेळी विविध राष्ट्रांमध्ये एकमत होऊ शकले नाही तर राजकीय ताणतणाव वाढतील. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेने २००७मध्ये वातावरणातील बदलांचा मुद्दा चर्चेत आणला तेव्हा काही देशांनी त्याला विरोध केला होता. अशा वेळी सुरक्षा परिषद आणि राष्ट्रसंघाची आमसभा (जनरल असेंब्ली) यांच्यात संघर्ष निर्माण होऊ नये यासाठी राष्ट्रसंघाला काही पावले उचलता येतील, उदाहरणार्थ, 'वातावरण सुरक्षा परिषद' (क्लायमेट सिक्युरिटी कौन्सिल) स्थापन करता येईल. हे राष्ट्रसंघासमोरील आव्हानाचे काम ठरेल. राष्ट्रसंघाने अशी पावले उचलली नाहीत तर काही राष्ट्रांना एकत्र येऊन इतर काही मार्गांचा अवलंब करता येईल. राष्ट्रसंघासमोर उभे ठाकू शकणारे आणखी एक आव्हान म्हणजे पर्यावरणामुळे स्थलांतर करावे लागणा-या विविध देशांमधील



नागरिकांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढली, तर त्यांच्यामुळे इतर देशांत निर्माण होणा-या विविध समस्यांमधून मार्ग शोधण्याचे. दुस-या महायुद्धानंतर आपल्या देशातील राजकीय हिंसाचारामुळे स्थलांतर करणा-या नागरिकांना संरक्षण देण्यासाठी राष्ट्रसंघाने कृती केली होती. अधिकृतरीत्या त्यांना 'शरणार्थी' (Refugees) मानण्यात आले होते. तर, पर्यावरणीय प्रश्नांमुळे आतापर्यंत स्थलांतर करणा-यांना 'शरणार्थी' न म्हणता 'पर्यावरणीय स्थलांतरित' (Environmental migrants) असे म्हणण्यात आले आहे. कारण, या नागरिकांची सोय करणे राष्ट्रसंघाला शक्य झालेले नाही. त्यामुळे सध्याचे हे 'पर्यावरणीय स्थलांतरित' त्यांना शक्य होईल त्या देशांत वास्तव्यास जात आहेत. शिवाय, स्थलांतर करणा-यांची संख्या २०५० पर्यंत सुमारे २० कोटी इतकी असेल, असा 'इंटर गव्हर्नमेंटल पॅनेल ऑन क्लायमेट चेंज'चा (IPCC) अंदाज आहे. एवढ्या मोठ्या संख्येने असणा-या नागरिकांची सोय राष्ट्रसंघाने पाहावी अशी अपेक्षा केली जाईल. एकंदरीत पाहता आंतरराष्ट्रीय पातळीवर स्थलांतरितांचा प्रश्न गंभीर ठरेल, असे दिसते.

## युरोपीय समुदाय

पृथ्वीचे वाढते तापमान रोखण्यासाठी वातावरणातील कार्बन डायॉक्साइडचे प्रमाण कमी करण्याच्या उद्दिष्टाने युरोपीय समुदायातील राष्ट्रांनी आजपर्यंत काही पावले उचलली आहेत. विविध वस्तूंच्या उत्पादन प्रक्रियेत तसेच त्यांच्या वापरातून प्रदूषण होऊ नये यासाठी या देशांनी काही धोरणे आखली आहेत. या देशांनी 'कार्बन ट्रेडिंग'ही मान्य केले आहे. पर्यावरणाच्या रक्षणासाठी असलेल्या 'क्योतो प्रोटोकॉल'नुसार देशांकडून, उद्योगांकडून कार्बन डायॉक्साइडचे उत्सर्जन किती प्रमाणात झाले तर चालेल याची मर्यादा निश्चित करण्यात येते. त्यापेक्षा कमी वा जास्त उत्सर्जन झाल्यास या वायूचे मूल्य निश्चित करून 'कार्बन ट्रेडिंग' करता येते. 'कार्बन ट्रेडिंग'च्या काही विशिष्ट पद्धती निश्चित करण्यात आल्या आहेत. आर्थिक फायदा होत असल्याने 'कार्बन ट्रेडिंग'मध्ये अनेक देश सहभागी होत आहेत. याशिवाय, 'ऑर्गनायझेशन ऑफ अमेरिकन स्टेट्स' या विषयात कार्य करू शकेल. 'आशिया-पॅसिफिक इकॉनॉमिक कॉर्पोरेशन' आणि असोसिएशन ऑफ 'साउथईस्ट एशियन नेशन्स रिजनल फोरम' आणि 'ईस्ट एशिया समिट' यांच्यामार्फतही अनेक राष्ट्रे 'कार्बन ट्रेडिंग'मध्ये सहभागी होऊ शकतात. युरोपीय समुदयात सहभागी झालेले देश भविष्यकाळातही 'कार्बन ट्रेडिंग'चे धोरण चालू ठेवण्याचा प्रयत्न करतील असे दिसते.

**अमेरिकेची भूमिका महत्त्वाची**

पर्यावरणाच्या रक्षणासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका महत्त्वाची ठरणार असली तरी जगाची महासत्ता बनलेल्या अमेरिकेकडून इतर राष्ट्रांच्या अधिक अपेक्षा आहेत व भविष्यातही असतील. त्यामुळे अमेरिकेच्या धोरणांना महत्त्व प्राप्त होईल. नैसर्गिक संकटे जेवढी व्यापक व गंभीर तेवढी अमेरिकेकडून होऊ शकणा-या मदतीची अपेक्षा जास्त असेल. अशा वेळी अमेरिकेची लष्करविषयक व परराष्ट्रविषयक धोरणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुरक्षा अशा अनेक विषयांचा ऊहापोह होणे क्रमप्राप्त ठरेल. पर्यावरणविषयक विविध प्रश्न पुढे येत जातील तेव्हा, कोणकोणत्या राष्ट्रांना कसकशी व किती वेळा मदत करायची असे प्रश्न अमेरिकेसमोर सतत उभे ठाकत जातील व त्यांची उत्तरे शोधणे हे अमेरिकेसाठी एक आव्हानच ठरेल. अमेरिकेने किती निधी व किती कालावधीत उपलब्ध करून द्यायचा ? मदत करताना अमेरिकेची सहकारी राष्ट्र कोणती असावीत ? अमेरिकेच्या लष्कराने अशा मदतकार्यात सहभागी व्हायचे की नाही ? आणि अशा वेळी लष्कर सहभागी झाल्यास त्या कार्याची व्याप्ती किती असावी ? हे प्रश्न या संदर्भात महत्त्वाचे ठरू शकतात.

यांतील अमेरिकेचा लष्करविषयक सहभाग हा चर्चेचा व चिंतनाचा विषय बनतो. कारण, अमेरिकेच्या धोरणांमुळे जागतिक पातळीवर भू-राजकीय (geo-political) संबंधांमध्ये परिणाम घडून येण्याची शक्यता असते. त्या धोरणांचा फायदा काही देशांना होऊ शकतो तर काही देशांसाठी ही धोरणे त्रासदायक ठरू शकतात. पण नैसर्गिक संकटे ही गंभीर स्वरूपाची व अचानक उभी ठाकतात तेव्हा भू-राजकीय बाबींचा विचार करण्यापेक्षा संकट निवारणाला प्राधान्य द्यावे लागते आणि तेव्हा अमेरिकेची मदत घेण्यावाचून पर्याय नसतो. उदाहरणार्थ, जागतिक पातळीवरील तत्कालीन घडामोडींसंदर्भात असलेल्या अमेरिकेच्या धोरणांबाबत इंडोनेशियातील नागरिकांमध्ये नाराजी होती. पण, २००४मध्ये अचानक त्सुनामीचे संकट उभे ठाकले होते तेव्हा इंडोनेशियाला अमेरिकेची मदत घ्यावी लागली होती. अमेरिकेच्या सुमारे डझनभर नौका, किमान पंधरा हजारावर सैनिक आणि सुमारे शंभर विमाने इंडोनेशियासाठी मदतकार्यात सहभागी झाली होती. अमेरिकेच्या मदतीनंतर इंडोनेशियातील नागरिकांच्या अमेरिकेबाबतच्या मतात परिवर्तन झाल्याचे २००५मधील एका सर्वेक्षणात दिसून आले. अर्थात, उभयपक्षी संबंधांवर या बदलाचे दीर्घकालीन परिणाम होतील वा नाही हे नेमकेपणाने सांगणे अवघड ठरते पण तसे होण्याची शक्यता अधिक असते.



त्यामुळे यापुढील काळात पर्यावरणविषयक प्रश्नांना सामोरे जाताना अमेरिकेची मदत घेतली जाण्याची शक्यता अधिक असली तरी काही देशांमध्ये अमेरिकेच्या लष्कराला विरोध होऊ शकतो. अशा वेळी मदतकार्य कसे करायचे, हे अमेरिकेसाठी एक मोठे आव्हान ठरेल. अमेरिकेच्या सैनिकांची सुरक्षा येथे लक्षात घ्यावी लागेल. आंतरराष्ट्रीय परिस्थिती व देशांतर्गत राजकीय परिस्थिती, अमेरिकी नागरिकांची भूमिका इत्यादी अनेक बाबी या वेळी विचारात घ्याव्या लागतील. त्यामुळे कुठे, केव्हा व किती कालावधीसाठी मदतकार्य करायचे हा सर्वंकष व समतोल निर्णय घेण्यात अमेरिकेची कसोटी लागणार आहे.

पर्यावरणीय बाबींमुळे समुद्रातील पाण्याची पातळी वाढली तर अमेरिकेचे लष्करही अडचणीत येऊ शकेल. म्हणजे, समुद्रसपाटीपासून कमी उंचीवर असणा-या बेटांवरील अमेरिकेचे लष्करी तळांना कदाचित आपले स्थान बदलावे लागेल. तसेच, अडचणीच्या परिस्थितीत त्वरित कृती करण्यासाठी लष्कराची सुस्पष्ट योजना तयार असावी लागेल. या परिस्थितीत नवीन तळ उभारण्यासाठी तसेच मदत करण्यासाटी किती निधी उपलब्ध करून द्यायचा, हा निर्णयप्रक्रियेतील अतिशय महत्त्वाचा घटक घटक ठरतो. देशांतर्गत मदतकार्यात आघाडीवर असलेल्या 'नॅशनल गार्डस्'चे कार्यही अमेरिकेला विचारात घ्यावे लागेल. कारण, वेळप्रसंगी त्यांच्यावर परदेशांतील मदतकार्य सोपविण्यात आले आणि त्याच वेळी अमेरिकेत जर संकट उद्भवले तर त्यांना देशांतर्गत मदतीसाठी माघारी बोलवायचे की नाही, हा बिकट प्रश्न अमेरिकेसमोर उभा ठाकेल. याशिवाय अमेरिकेच्या सैनिकांचे मदतकार्य नाराजीने मान्य करणा-या देशांमध्ये अमेरिकी सैनिकांनी कशी मदत करायची याचे प्रशिक्षण हाही अमेरिकेच्या चिंतनातील महत्त्वाचा मुद्दा ठरावा.

या सर्व दृष्टीने येती तीन ते चार दशके महत्त्वाची ठरू शकतात. त्यातच माहिती व तंत्रज्ञानाच्या उपलब्धतेमुळे पर्यावरण विषयक विविध प्रश्न विविध देशांतील नागरिकांपर्यंत वेगाने पोहचणार आहेत. 'आहे रे' व 'नाही रे' यांच्यातील दरीही यावेळी प्रकर्षाने पुढे येण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वच देशांमधील नागरिकांमध्ये, धोरणकर्त्यांमध्ये व प्रशासनांत पर्यावरणविषयक प्रश्नांबाबतची सजगता वाढण्याची नितांत गरज आहे. एवढेच नव्हे तर त्याबाबत गांभीर्याने विचार करून योग्य ती कृती करण्याचे आव्हान सर्व देशांसमोर आहे. हे आव्हान पेलता आले तरच पर्यावरणीय संकटांपासून मानवसमूह वाचू शकतील. ■■

अहवाल

# आढावा वर्षाचा...

## अर्थबोधपत्रिका : १ एप्रिल २००८ ते ३१ मार्च २००९

'माहितीचा विस्फोट' ही आजच्या जगातील परवलीची संज्ञा बनलेली आहे. त्यामुळे ज्ञानाच्या आदानप्रदानाची प्रक्रियाही आमूलाग्र बदलावी हे स्वाभाविकच ठरते. ज्ञान संपादन करणे, हे म्हटले तर आज आव्हान उरलेले नाही आणि म्हटले तर तेच आजचे मोठे आव्हानही आहे. कारण, चारी बाजूंनी माहितीचे लोट आपल्या अंगावर अक्षरशः कोसळत असतात. या माहितीचे तर्कशुद्ध विश्लेषण-विवेचन-परीक्षण करून भवताली घडणा-या घटनांचे यथायोग्य 'ज्ञान' करून घेणे, हेच ते मोठे आव्हान. ज्ञानाचे 'रॉ मटेरियल' असलेली माहिती जिज्ञासू वाचकांसमोर निखळ स्वरूपात साधार मांडणे हाच 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रकाशनमागील हेतू. ३१ मार्च २००९ रोजी पूर्ण झालेल्या 'अर्थबोधपत्रिके'च्या सातव्या खंडाचा आढावा येथे सादर केला आहे तो हा हेतू कितपत सफल होतो हे तपासून पाहणे आपल्या सगळ्यांनाच शक्य व्हावे यासाठीच.

**(१) प्रकाशित साहित्य -** अंकातील लेख (५२) व पुरवणी लेखांसह (४) एकूण ५६ लेख. 'जिकडेतिकडे' या सदरांतर्गत एकूण १० स्फुटे. वाचकांनी पाठविलेली एकूण सात पत्रे. 'अर्थबोधपत्रिके'च्या सहाव्या खंडातील १२ अंकांमधील एकंदर लेखसंख्या इतकीच होती, हे पुढील पानावरील तौलनिक तक्त्याद्वारे ध्यानात येते. सहाव्या खंडात 'औद्योगिक', 'तंत्रज्ञान' आणि 'धर्मविचार' या तीन विषयांतर्गत सहा लेख प्रकाशित करण्यात आले होते. सातव्या खंडात या तीन विषयांवरील लेख नव्हते. तर, सातव्या खंडात असलेला 'कामगार' हा विषय सहाव्या खंडात नव्हता.

**(२) विविध देशांचा फेरफटका -** जागतिकीकरणाच्या आजच्या युगात जगाचे नागरिक बनलेल्या आपल्या सर्वांना जागतिक स्तरावरील विविध घडामोडींची जाणीव असणे हे गरजेचे आहे. त्या नुसार, जगभरात कुठे काय विषय महत्त्वाचे ठरत आहेत, विविध देशांमधील राजकीय स्थिती काय सांगते असा विचार करून 'अर्थबोधपत्रिके'त काही देशांबाबत लेख प्रसिद्ध करण्यात आले. उदाहरणार्थ, 'तुवालू' हा इवलासा देश पर्यावरणीय प्रश्नांसंदर्भात महत्त्वाचा ठरतो आहे ही बाब नवीन वाटली म्हणून त्या विषयीचा लेख आवर्जून प्रसिद्ध केला. जागतिकीकरणाच्या संदर्भात होंडुरासमधील



**प्रकाशित लेखांचे विषयवार वर्गीकरण**

| अ. क्र. | विषय | लेखसंख्या - खंड ६ (एप्रिल २००७-मार्च ०८) | लेखसंख्या - खंड ७ (एप्रिल२००८-मार्च ०९) |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक | ८ | ५ |
| २ | आर्थिक | ८ | १० |
| ३ | राजकीय | ४ | ७ |
| ४ | पर्यावरण | ९ | ५ |
| ५ | आरोग्य | १ | ६ |
| ६ | सांस्कृतिक | ७ | ६ |
| ७ | नागरीकरण | ४ | १ |
| ८ | शिक्षण | २ | ४ |
| ९ | विज्ञान-संशोधन | २ | ६ |
| १० | कामगार | -- | २ |
| ११ | धर्मविचार | २ | -- |
| १२ | तंत्रज्ञान | २ | -- |

**प्रकाशित लेखांचे विषयवार वर्गीकरण**

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | औद्योगिक | ५ | -- |
| १४ | पुरवणी लेख | २ | ४ |

घटनाही बोलकी होती. मासेमारी हा विषय योग्य रीतीने हाताळून आइसलँडने एक चांगले उदाहरण जगापुढे आणले. ही झाली काही उदाहरणे वानगीदाखल. त्या व्यतिरिक्त भारत, इराण, इंडोनेशिया, चीन, अमेरिका, ब्रिटन, जपान, ब्राझील, मलेशिया, नेदरलँडस्, आइसलँड इत्यादी १२ देशांमधील विविध घटना-घडामोडींवर आधारित लेख प्रसिद्ध करण्यात आले.

**(३) विशेषांक -** 'आधी पोटोबा, मग विठोबा', ही म्हण आपल्या सर्वांच्या परिचयाची आहे. पोटच भरले नाही तर....?.... म्हणूनच विशेषांक प्रसिद्ध करताना 'अन्नसुरक्षा' या विषयाला महत्त्व देण्यात आले (जुलै २००८). पोट भरले की शिक्षण हवेच आणि पोट भरण्यासाठीही शिक्षण हवेच. पुण्यासारख्या महानगरांत महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांबाबतचा भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीने केलेल्या अभ्यासाचा तपशील 'शिक्षणविशेष' या विशेषांकाद्वारे आपल्यापर्यंत पोहचविण्यात आला (सप्टेंबर २००८). आपापल्या गावातील प्राथमिक शिक्षणाची परिस्थिती अभ्यासण्याची प्रेरणा जिज्ञासूंना मिळावी हा हेतू त्या मागे होता. दीपावली हा आपला सांस्कृतिक सण. लक्ष्मीचे आणि पर्यायाने समृद्धीचे पूजन हा या सणाचा गाभा. भारताप्रमाणेच इतर देशांमध्ये, संस्कृतींमध्ये लक्ष्मीविषयक - म्हणजेच धनविषयक - चिंतन कशा प्रकारे केलेले असते या उत्सुकतेतून 'दीपावली धनविशेष' अंक साकारला (ऑक्टोबर २००८). 'जागतिकीकरण' (डिसेंबर २००८) आणि 'विज्ञान बोध' (फेब्रुवारी २००९) हे विशेषांकही या वर्षी प्रसिद्ध करण्यात आले. असे एकूण पाच विशेषांक या वर्षी सादर केले गेले.

**(४) संदर्भ साहित्य -** देशी-विदेशी अशी एकूण १४ नियतकालिके - करंट हिस्टरी इकॉनॉमिस्ट, न्यू सायंटिस्ट, प्रॉस्पेक्टस्, न्यू स्टेटस्मन, फार ईस्टर्न कॉनॉमिक रिव्ह्यू, इकॉलॉजिस्ट, रिसर्जन्स, धर्मवर्ल्ड, इलेक्ट्रॉनिक्स फॉर यू, सर्व्हायव्हल, जिऑग्राफिकल, ओपेक बुलेटिन. एकूण २४ पुस्तके व ३३ वेबसाइटस् यांद्वारे मिळालेली माहिती. या शिवाय, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीमधील समृद्ध ग्रंथालयातील अहवाल. ■■



*(पृष्ठ ३२ वरून )*

अनेक ठिकाणची डासांची पैदास वाढू शकते व त्यांच्याद्वारे रॉस रिव्हर, मलेरिया व डेंग्यू असे तापाचे आजार समाजात फैलावू शकतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या अभ्यासानुसार मलेरिया व कुपोषणामुळे प्रतिवर्षी सुमारे दीड लाख नागरिकांना जिवास मुकावे लागते. पाण्याचे, हवेचे प्रदूषण वाढल्याने व अन्नउत्पादनावरही त्याचे विपरीत परिणाम घडून आल्याने अनेक आजारांचा प्रादुर्भाव होतो. पिण्याचे स्वच्छ पाणी उपलब्ध नसल्याने जगभरात प्रतिवर्षी लाखो नागरिकांना मृत्युमुखी पडावे लागते. अर्थात, वातावरणातील बदलामुळे काही रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता अधिक असली तरी विविध देशांमधील सामाजिक, आर्थिक, राजकीय व आरोग्यविषयक परिस्थिती भिन्न असल्याने वेगवेगळ्या देशांवर त्याचे वेगवेगळे परिणाम होऊ शकतात/ होतात. उदाहरणार्थ, विकसनशील देशांमध्ये आरोग्याच्या पुरेशा सोयी नसल्याने हे देश अशा परिस्थितीत अधिकच अडचणीत येऊ शकतात. वादळे, पूर, दुष्काळ अशा काही नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण भविष्यात वाढू शकते, असा इशारा काही अभ्यासांमधून देण्यात येत आहे. पृथ्वीचे वाढते तापमान हे या आपत्ती वाढण्यामागे एक कारण असले तरी लोकसंख्येत सतत होणारी वाढ हेही एक मोठे कारण त्यामागे असल्याचे काहींचे मत आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आरोग्य व नैसर्गिक आपत्ती या बाबी महत्त्वाच्या ठरतात.

पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे घडून येणारे विविध प्रकारचे बदल हे किती वेगाने होतील, कोणत्या कालावधीत होतील, त्याचे परिणाम कितपत गंभीर असतील असे नेमकेपणाने सांगणे अवघड आहे. पण अनेक अभ्यास याची पूर्वसूचना देत आहेत. वातावरणातील बदलांमुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा मुद्दा आंतरदेशीय संबंधांत तसेच देशांतर्गत समाजगटांमध्ये केंद्रबिंदू ठरून त्यावरून युद्धेही होण्याची शक्यता काही अभ्यासक मांडतात. किंबहुना इतिहासात अशा काही घटना घडल्याचेही ते नजरेस आणतात. पर्यावरणात असमतोल निर्माण झाल्याने मानवसमूह नष्ट होण्याच्या शक्यतेकडे वाटचाल करण्याचा धोका वेळीच ओळखला तरच तो टाळता येण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्वच देशांनी याबाबत त्वरित योग्य पावले उचलणे गरजेचे ठरते. देशोदेशींच्या धोरणांत पर्यावरणाचा मुद्दा केंद्रस्थानी असणे व त्यादृष्टीने अधिक सखोल व सर्वंकष अभ्यास करणे येथून पुढे गरजेचे ठरावे. तरच मानवसमूहांचे भविष्य चांगले घडण्याची शक्यता दृष्टिपथात येईल. ■■

## प्रमुख संदर्भ

(1) The Economist: December 13th-19th 2008 (pp. 13, 29-31, 45, 52, 70, 84), January 31st-February 6th 2009 (pp. 9, 27-30, 67-70), February 7th-13 2009 (pp 9, 48-49, 53, 61-62, 71), February 14th-20th 2009 ( Special Report on the New Middle Classes), March 14th-20th 2009 (Special Report on Entrepreneurship).

(2) Far Eastern Economic Review, October 2008 (pp. 15-24), November 2008 (pp. 6-10) , January-February 2009 pp. 8-13, March 2009 (pp. 6-11, 17-20) .

(3)The Strategic Implications of Climate Change by Alan Dupont, Survival/vol 50 no.3/June-July 2008/pp. 29-54

(4) The Security Implications of Climate Change by John Podesta and Peter Ogden, The Washington Quarterly (Winter 2007-08), 31:1 pp. 115-138.

■■

### भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.



## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे प्रकाशन

*आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ*

# कर्ता-करविता

## आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

● मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

पृष्ठे २४२ किंमत ३५०/-रुपये

**ग्रंथ घेणा-यांना अर्थबोधपत्रिका मासिक एक वर्ष विनामूल्य**

### 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**( १ जून २००६ पासून)**

**वार्षिक वर्गणी** १०० / - रुपये

**द्वैवार्षिक वर्गणी** १८०/ - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

**त्रैवार्षिक वर्गणी** २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट

**पंचवार्षिक वर्गणी** ४.०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक ( किंमत ४०/-रुपये)